रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ५०
www.ramprahar.com
◆ शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# सण-उत्सव साजरीकरणासंदर्भात जनसंवादातून मार्ग निघेल : मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**




सण आणि उत्सव हे पारंपरिक पद्धतीने साजरे व्हायला हवेत, मात्र यामध्ये वर्षानुवर्षे काही पद्धती पडतात. अशा पद्धती बंद करताना केवळ कायद्याचा बडगा उगारणे योग्य ठरत नाही. त्यासाठी लोकांना विश्वासात घेऊन आणि त्यावर चर्चा करून मार्ग काढावा लागतो. त्या दृष्टीने पुण्यात पोलीस आयुक्तांनी गणेशोत्सवातील सर्व घटकांसोबत चर्चा केली आहे. त्यात बऱ्याच गोष्टींवर एकमत झाले असून यातून योग्य तोडगा निघेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

गणेशोत्सवात डीजे आणि ढोल–ताशामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ध्वनिप्रदूषण करणाऱ्या या गोष्टी बंद कराव्यात, अशी मागणी पुण्यातील विद्यानंद बापट यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.४) भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, डीजेमुळे लोकांना खूप त्रास होतो. त्यातून भूकंप झाल्यासारखा आवाज निर्माण होतो. अशा सगळ्या गोष्टी घडू नयेत यावर सर्वांचेच एकमत आहे. पुण्यात गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याच्या दिशेने पाऊल टाकण्यात आले आहे. आगामी काळात डीजेचे स्तोम कमी झालेले दिसेल अथवा ते संपताना दिसेल. तोपर्यंत गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने किंवा किमान ध्वनीसह साजरा करावा लागेल.

यावेळी पत्रकारांनी मुख्यमंत्र्यांना बापट यांच्या शुद्ध मराठीवरून प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले, त्यांची मराठी सध्या ट्रेंडिंग आहे. मराठी भाषेच्या शुद्धतेचा एक नमुनाच त्यांच्या बोलण्यातून पाहायला मिळतो. आता अपेक्षा एवढीच करू की, आपले विचार मांडताना इतरांना त्याचा फार त्रास होणार नाही. जसे ते त्यांचे विचार शुद्ध मराठीत मांडतात तसेच त्यांनी ते सर्वसमावेशकपणे मांडावेत.

## आज दहीहंडीची धूम

**अलिबाग : प्रतिनिधी**



गोकुळाष्टमी शुक्रवारी झाल्यानंतर आता शनिवारी (दि. ५) गोपाळकाल्याची धूम सर्वत्र असणार आहे. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथके सज्ज झाली आहेत.

हल्ली दहीहंडी सणाला पारंपरिकतेसोबत स्पर्धेचे स्वरूप आले आहे. गेल्या काही वर्षात दहीहंडी हा साहसी खेळ म्हणून साजरा होतो. अगदी पन्नास हजारांपासून दहा लाखांच्या रोख रकमेची बक्षिसे दिली जातात. त्यामुळे पूर्वी मर्यादित असलेली गोविंदा पथकांची संख्या वाढली आहे. दहीहंडी या खेळात आता महिलादेखील उतरल्या आहेत. त्याचप्रमाणे यानिमित्ताने मनोरंजनाचे कार्यक्रम सादर होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# कामोठ्यातील 'एल.के. विवांता'च्या अनधिकृत मजल्यांवर हातोडा

## पनवेल मनपाची धडक कारवाई



**पनवेल** : महापालिकेच्या प्रभाग समिती 'क' अंतर्गत कामोठे सेक्टर २२मधील भूखंड क्रमांक ७३ व ७४वर उभारण्यात आलेल्या एल.के. विवांता इमारतीमधील विनापरवानगी बांधकामावर हातोडा पडला आहे. येथील अनधिकृत चार मजल्यांवर महापालिकेमार्फत गुरुवारी धडक कारवाई करण्यात आली.

तोडक कारवाई करण्याबाबत महापौर नितीन पाटील यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित विभागास आदेश दिले. त्यानुसार गुरुवारी तत्काळ कारवाई करण्यात आली. या इमारतीच्या बांधकामास मंजुरी असलेल्या ११ मजल्यांच्या आराखड्याव्यतिरिक्त १२, १३, १४ आणि १५ असे चार मजले विनापरवानगी बांधण्यात आल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले होते. (पान २ वर..)












# बालकांच्या दत्तक प्रक्रियेसाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे -मंत्री आदिती तटकरे

**मुंबई : प्रतिनिधी**

विशेष गरजा असलेल्या बालकांना कायमस्वरूपी, प्रेमळ आणि आधार देणारे कुटुंब मिळावे यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. दत्तक प्रक्रियेची व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्यपूर्ण सहकार्य, जनजागृती आणि सर्व घटकांमधील प्रभावी समन्वय आवश्यक असून, दिव्यांग बालकांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी कुटुंबाधारित संगोपनाला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असल्याचे मत महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.



केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयांतर्गत कार्यरत केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाने (सीएआरए) विशेष गरजा असलेल्या दिव्यांग बालकांच्या दत्तक प्रक्रियेला आणि कुटुंबाधारित संगोपनाला अधिक बळकटी देण्यासाठी पश्चिम विभागीय चौथी प्रादेशिक सल्लामसलत कार्यशाळा पुणे येथे नुकतीच आयोजित करण्यात आली होती. यावेळी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे मंत्री आदिती तटकरे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

सीएआरएच्या 'दत्तक जागरूकता अभियान २०२५' अंतर्गत महाराष्ट्र शासन आणि राज्य दत्तक संसाधन संस्था (एसएआरए), यांच्या सहाय्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'विशेष गरजा असलेल्या दिव्यांग बालकांच्या संस्थाबाह्य पुनर्वसनाला प्रोत्साहन' ही या अभियानाची संकल्पना आहे. विशेष गरजा असलेल्या बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि पोषक कौटुंबिक वातावरण उपलब्ध करून देणे तसेच त्यांचे कुटुंबाधारित संगोपन आणि दत्तक प्रक्रियेला प्रोत्साहन देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

यावेळी सीएआरएच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव भावना सक्सेना म्हणाल्या की, आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये विशेष गरजा असलेल्या ३९४ बालकांना दत्तक घेण्यात आले असून आर्थिक वर्ष २०२४-२५मधील ३१३ दत्तकांच्या तुलनेत ही वाढ २५ टक्के आहे. विशेष गरजा असलेल्या अधिकाधिक बालकांना कायमस्वरूपी कुटुंबाधारित संगोपनाची संधी मिळावी यासाठी सर्व संबंधितांनी अधिक व्यापक आणि समन्वित प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सक्सेना यांनी नमूद केले.

या कार्यशाळेत राज्य दत्तक संसाधन संस्था (एसएआरए), विशेष दत्तक संस्था (एसएए), बाल संगोपन संस्था (सीसीआय), जिल्हा बाल संरक्षण कक्ष (डिसीपीसी), मुख्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच बाल संरक्षण क्षेत्रातील विविध तज्ज्ञ आणि अधिकारी सहभागी झाले होते.

**दत्तक प्रक्रियेत राज्य देशात अव्वल**

नागपूर येथे ऑनलाइन दत्तक प्रक्रियेद्वारे सात बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि कायमस्वरूपी कुटुंबाचा आधार मिळाला आहे. फ्रान्स, मुंबई, पुणे आणि वर्धा येथील दत्तक इच्छुक पालकांसाठी कायदेशीर दत्तक आदेशाची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. ही प्रक्रिया बालकांच्या सर्वोत्तम हिताला प्राधान्य देत संस्थात्मक संगोपनाऐवजी त्यांना प्रेमळ कौटुंबिक वातावरण मिळवून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे.

ऑनलाइन प्रणालीमुळे दत्तक प्रक्रियेत पारदर्शकता, सुलभता आणि कार्यक्षमता वाढून सात बालकांच्या आयुष्यात सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्याची नवी सुरुवात झाली आहे.

## उरणमध्ये घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

**उरण : वार्ताहर**




घराच्या उघड्या खिडकीतून आत प्रवेश करून लाखो रुपयांच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला उरण पोलिसांनी अत्यंत शिताफीने जेरबंद करत गुन्हा उघडकीस आणला आहे. उरण पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे हा गुन्हा अवघ्या काही दिवसांत उघड झाला आहे.

पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सहआयुक्त दीपक साकोरे, अप्पर आयुक्त प्रमोद शेवाळे आणि उपायुक्त अमित काळे यांनी घरफोडीच्या गुन्ह्यांचा तात्काळ तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दि. १७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० च्या दरम्यान आवरे, ता. उरण येथील एका घराच्या खिडकीतून आत प्रवेश करून अज्ञात चोरट्याने ९ लाख ७७ हजार ३०० रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्याते गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळ आणि आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली असता आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचा कोणताही ठावठिकाणा नसून तो पत्नीसोबत राहत नसल्याची माहिती मिळाली. अधिक तपासात तो सोलापूर, अक्कलकोट, चाकण, आदमापूर, कोल्हापूर परिसरातील वेगवेगळ्या लॉजमध्ये राहत असल्याचे समोर आले. तब्बल २६ दिवस त्याचा मागोवा घेतल्यानंतर पोलिसांनी आरोपी अनिल लक्ष्मण नाईक, वय ४८, धंदा रिक्षा चालक, रा. गिरवले, ता. पनवेल याला कोल्हापूरहून पनवेलकडे प्रवास करत असताना मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील खालापूर टोलनाक्यावर सापळा रचून दि. ३१ ऑगस्ट रोजी अटक केली.

चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीस गेलेल्या ९ लाख ७७ हजार रुपयांपैकी ९ लाख ६४ हजार ३०० रुपयांचे सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली रिक्षा हस्तगत करण्यात आली आहे. आरोपीवर यापूर्वी नवी मुंबई आणि रायगड परिसरात घरफोडी, जबरी चोरीचे एकूण ६ गुन्हे दाखल आहेत.

## कामोठे येथे बसचालकाकडून बालिकेचा विनयभंग, गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

शाळेतून बसने घरी परतणाऱ्या साडेतीन वर्षांच्या बालिकेचा बसचालकाने विनयभंग केल्याची घटना बुधवारी दुपारी कामोठे येथे घडली. या प्रकरणी बालिकेच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून कामोठे पोलिसांनी संबंधित बसचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील पीडित बालिका कुटुंबासह कामोठे सेक्टर १८ येथे राहते. ती सेक्टर ३६ येथील शाळेतून बसने घरी परतत होती. त्यावेळी बसचालकाने तिचा विनयभंग केल्याचे पालकांनी तक्रारीत म्हटले आहे. घरी आल्यानंतर पालकांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी रात्री साडेदहा वाजता तातडीने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

या गंभीर घटनेची दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख यांनी तातडीने गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या. संबंधित चालक ३० वर्षांचा असून तो कळंबोली सेक्टर ३ येथील माऊली मंदिराजवळ राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश इंगळे करीत आहेत. बालिकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीतर्फे भव्य प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या वतीने विविध कलाकुसर, गृहउद्योग, खाद्यपदार्थ, फॅशन, जीवनशैली व विविध उपयुक्त वस्तूंचे आकर्षक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांना त्यांच्या कलागुणांना व व्यवसायिक कौशल्यांना व्यासपीठ मिळावे, स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे तसेच त्यांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, हा या प्रदर्शनामागील प्रमुख उद्देश होता.

प्रदर्शनात विविध क्षेत्रातील उद्योजक व विक्रेत्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. आकर्षक स्टॉल्स, वैविध्यपूर्ण उत्पादने आणि उत्कृष्ट मांडणीमुळे प्रदर्शनाला विशेष रंगत आली. नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देत विविध वस्तूंची खरेदी केली आणि सहभागी प्रदर्शकांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या अध्यक्षा स्नेहल कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव विजयता कोठारी आणि समन्वयक बिजल मिरानी यांच्या नियोजन व परिश्रमातून या प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. क्लबच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनीही आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

प्रदर्शनादरम्यान इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या वतीने सर्वांसाठी मोफत दंत तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. क्लबच्या सदस्या व दंतचिकित्सक डॉ. भावना मुरुडकर आणि त्यांच्या टीमने उपस्थित नागरिकांची दंत तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनासोबतच आरोग्यविषयक जनजागृती आणि सेवा देण्याचा हा उपक्रम क्लबच्या सामाजिक बांधिलकीचे आणखी एक सुंदर उदाहरण ठरला. "Grow and Flourish" या Inner Wheel च्या यावर्षीच्या थीमला अनुसरून, महिलांच्या कौशल्यांना व उद्योजकतेला प्रोत्साहन देत त्यांना विकासाच्या आणि स्वावलंबनाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम एक सुंदर प्रयत्न ठरला.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अँटी-रॅगिंग जनजागृती सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अँटी-रॅगिंग समितीच्या वतीने गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या परिसरात अँटी-रॅगिंग जनजागृती सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच महाविद्यालयाच्या परिसरात आणि महाविद्यालयाबाहेरही रॅगिंगला प्रतिबंध करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे हा होता. या सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून प्रा. नितीन खरतड (डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय वडाळा) यांनी उपस्थित राहून रॅगिंगचे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक व सामाजिक जीवनावर होणारे दुष्परिणाम, रॅगिंगविरोधी नियम व प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

या जनजागृती सत्राला महाविद्यालयातील प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी सत्रादरम्यान रॅगिंगविरोधी नियम व उपाययोजनांविषयी माहिती जाणून घेतली आणि महाविद्यालयात सुरक्षित, शिस्तबद्ध व सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सहकार्य करण्याचा संदेश दिला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आरटीसीसीएसच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे अँटी-रॅगिंग समितीच्या वतीने मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील यांनी केले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या सक्रिय सहभागाबद्दल व सहकार्याबद्दल समितीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगविरोधी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून महाविद्यालयीन परिसर सुरक्षित व आनंददायी ठेवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

## अलिबाग येथील हातमाग, यंत्रमाग कापड प्रदर्शन व विक्री दालनाचा शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राची भव्य परंपरा असलेल्या सोलापूर येथील पारंपरिक हातमाग व यंत्रमाग कापड प्रदर्शन व विक्री दालनाचे अलिबाग शहरात स्थळः डोंगरे हॉल, सार्वजनिक वाचनालय मुख्य पोस्ट ऑफिस समोर अलिबाग (डोंगरें हॉल) येथे दीपप्रज्वलन करून उदघाटन करण्यात आले.



यावेळी जिल्हा परिषद कर्मचारी युनियन अध्यक्ष राजेन्द्र गायकवाड, व महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना जिल्हा रायगड अध्यक्ष साईनाथ पवार, व अनिल नांदगावकर, प्रवीण तुरे, काशिनाथ थळकर, संजय तवटेकर व संतोष बोंद्रे मान्यवर यावेळी उपस्थित होते दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत हे दालन सुरु राहणार सोलापूर येथील सुपरसिद्ध हातमाग व यंत्रमाग कापडाच्या भव्य प्रदर्शन व विक्री भाऊराया हॅन्डलुमच्या यांच्या कडून हे कापड दालन खास गौरी गणपती सणानिमित्त ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे

सोलापूर सुप्रसिद्ध कॉटन साडी, कॉटन इरकली, सेमी पैठणी, खादी सिल्क, लिनन खादी साडी, इरकली ड्रेस मटेरियल, खशिदा वर्क ड्रेसमटेरियल, कलमकारी ड्रेस मटेरियल, वर्क ड्रेस टॉप, परकर, गाउन, सोलापूर चादर, बेडशिट, सतरंजी, टॉवेल नॅपकिन, कुर्ती, वुलेन चादर, मॅट, कॉटन शर्ट, खादी शर्ट, बेडी, लेडीज हँडबॅग, कलाकुसर वस्तू या प्रदर्शन व विक्री खास ग्राहकांसाठी स्पेशल २०% टक्के सवलत असल्याची माहिती पुरुषोत्तम पोतन यांनी दिली.

**पान १ वरुन**

## कामोठ्यातील 'एल.के. विवांता'च्या अनधिकृत मजल्यांवर हातोडा

या अनधिकृत बांधकामासंदर्भात महापालिकेने यापूर्वी संबंधित बांधकामधारकास नोटीस बजावल्या तसेच बांधकाम तत्काळ थांबविण्याबाबत सूचना करण्यात आल्या, पण या नोटीसांना न जुमानता बांधकाम सुरू ठेवण्यात आले होते. संबंधित प्रकरणी सुनावणी घेऊन अनधिकृत बांधकाम स्वतःहून निष्कासित करण्याचे आदेशही देण्यात आले होते.

पनवेल महापालिकेने २० ऑगस्ट रोजी बजाविलेल्या नोटीसीद्वारे संबंधितांना महाराष्ट्र महापालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६मधील तरतुदींनुसार महापालिकेमार्फत तोडक/निष्कासनाची कारवाई करण्यात येईल आणि त्यासाठीचा खर्च संबंधित अनधिकृत बांधकामधारकाकडून वसूल करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले होते.

एल.के. विवांता इमारतीमध्ये ए आणि बी अशा दोन विंग असून प्रत्येक विंगमध्ये १२ ते १५ या चार अनधिकृत मजल्यांवर प्रत्येकी १० सदनिका आहेत. त्यानुसार एका मजल्यावर एकूण २० सदनिका असून चार अनधिकृत मजल्यांमध्ये एकूण ८० सदनिकांचे बांधकाम करण्यात आले आहे.

याबाबत संबंधित कंपनीने उच्च न्यायालयात स्थगिती देण्याची मागणी केली होती, मात्र उच्च न्यायालयाने याबाबत कोणतीही स्थगिती दिलेली नाही. अखेर पनवेल महापालिका अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, अनधिकृत बांधकाम विभागाचे प्रमुख अमर पाटील तसेच पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत तोडक कारवाई करण्यात आली.

अनधिकृत बांधकामांविरोधात पनवेल महापालिका कठोर भूमिका घेत असून मंजूर आराखड्याच्या विरोधात व विनापरवानगी करण्यात येणाऱ्या बांधकामांवर महाराष्ट्र महापालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदींनुसार नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मंजूर बांधकाम आराखड्याच्या विरोधात, आवश्यक परवानग्यांशिवाय अथवा मंजूर परवानगीपेक्षा अधिक करण्यात येणाऱ्या बांधकामांविरोधात महापालिका नियमानुसार कारवाई करत असून अशा अनधिकृत बांधकामांना कोणत्याही प्रकारे संरक्षण दिले जाणार नाही, अशी भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली आहे.

## रायगड जिल्हा परिषदेकडून आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १५ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे एक विशेष शिक्षक पुरस्कारही देण्यात येणार आहे. या शिक्षकांचा महाड येथे १० सप्टेंबर रोजी भव्य सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी अलिबाग तालुक्यातील सुगंधा पाटील राजिप शाळा वाडगाव, पेण रामकृष्ण भोईर राजिप शाळा मायणी कोयना, पनवेल विभावरी सिंगासने तळोजे पाचनंद, कर्जत राजेश मेचकर राजिप शाळा मार्गाची शाळा, खालापूर रुपाली पाटील राजिप शाळा मोहोपाडा, उरण शर्मिला गावंड राजिप शाळा नवीन शेवे, सुधागड स्मिता जगताप राजिप शाळा रासळ आदिवासीवाडी, रोहा अमिता बामणे राजिप शाळा रोठ खुर्द, महाड संजय कोंडविलकर राजिप शाळा कांबळे तर्फे महाड, श्रीवर्धन मनोज माळवदे राजिप शाळा बापवन, म्हसळा महादेव पवार राजिप शाळा तुरूंबाडी, पोलादपूर संगिता नगरकर राजिप शाळा चांभारगणी खुर्द, माणगाव सरफराज कोंडविलकर राजिप उर्दु शाळा टेमपाले, तळा धर्मा राणे राजिप शाळा मालाठेवाडी तर मुरूड तालुक्यातील महेंद्र सातामकर राजिप शाळा साळाव यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

यासोबतच पनवेल तालुक्यातील राजिप शाळा केळवणेचे उपशिक्षक कुमार पाटील यांना विशेष शिक्षक पुरस्कार कला जाहीर करण्यात आला आहे.

या सर्व शिक्षकांचा गौरव करण्यासाठी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाट्यगृह येथे गुरुवारी ता.१० सप्टेंबर पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, वित्त व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, कृषि व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, समाजकल्याण सभापती नारायण डामसे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, शिक्षणाधिकारी प्राथमिक संजय नाईकडे यांच्यासह सर्व सदस्यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## दुखवटा

### कविता जांबेकर



**नागोठणे :** आमडोशी गावच्या रहिवासी कविता उत्तम जांबेकर (वय ६२) यांचे बुधवार दिनांक २ सप्टेंबर रोजी संध्याकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर यांच्या त्या मातोश्री होत. दिवंगत कविता जांबेकर यांच्या पश्चात पती, दोन विवाहत मुलगे सोपान व हेमंत, एक विवाहित मुलगी हेमलता कडव, सुना, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

### वसंत म्हात्रे



**नागोठणे :** वरवठणे येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजप नेते किशोरभाई म्हात्रे यांचे काका वसंत हिरू म्हात्रे (वय ७०) यांचे गुरुवार दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, पुतणे, पुतण्या, भाचे तसेच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शनिवार दि. १२ सप्टेंबर रोजी नागोठणे येथील अंबा नदीतीरावर, तर बारावे रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी वरवठणे, ता. रोहा येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती म्हात्रे कुटुंबीयांनी दिली.

### उदय भिसे



**नागोठणे :** ज्येष्ठ पत्रकार आणि नागोठणे पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय रघुनाथ भिसे (वय ६५) यांचे मंगळवारी (दि.१) मध्यरात्री हृदयविकाराच्या धयाने निधन झाले. दिवंगत उदय भिसे यांच्या पार्थिवावर बुधवारी(दि.२) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास येथील आंबा घाटावरील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत उदय भिसे यांच्या रूपाने नागोठणे गावातील पत्रकारितेतील जुन्या पिढीतील शेवटचा पत्रकार हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# गटई कामगारांच्या व्यवसाय परवान्यासंदर्भात बैठक; आमदार प्रशांत ठाकूर, महापौर, आयुक्तांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्ती व्यवसाय करणारे अनुसूचित जाती प्रवर्गातील चर्मकार गटई कामगारांच्या व्यवसायाला प्रतिष्ठा व संरक्षण मिळावे याकरिता पनवेल महानगरपालिका क्षेत्रांतर्गत व्यवसाय करणारे गटई कामगारांना परवाना मिळावा याकरिता पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महानगरपालिकेत धोरणात्मक बैठक संपन्न झाली

पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे व त्यांचे सर्व सहकारी तसेच स्थायी समितीचे अध्यक्ष बबन मुकादम, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती अध्यक्ष अजय बहिरा, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दर्शन ठाकूर, राष्ट्रवादीचे नेते व गटई कामगार युनियनचे अध्यक्ष, माजी नगरसेवक शिवदास कांबळे, युनियनचे प्रतिनिधी राजकुमार डोयरीया, शंकर परदेशी यांच्यासह गटई कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्यावतीने गटई कामगारांना १००% अनुदानावर स्टॉल उपलब्ध करून देण्यात येतात. त्याचबरोबर संत रोहिदास चर्मउद्योग विकास महामंडळाकडून अवजारे व कच्चा माल याकरिता अनुदान योजना आहे. सर्व योजनांचा लाभ घेऊन उदरनिर्वाह चालवत उद्योगाशी निगडित व्यवसाय करण्याची संधी चर्मकार समाजातील बांधवांना असल्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने व्यवसाय परवाने द्यावेत याकरिता राष्ट्रवादीचे नेते व गटई कामगार युनियनचे अध्यक्ष, माजी नगरसेवक शिवदास कांबळे महानगरपालिकेकडे पाठपुरावा करीत आहेत. त्याला सकारात्मक प्रतिसाद आमदार प्रशांत ठाकूर व महापौर नितीन पाटील यांनी या धोरणात्मक बैठकीत दिला. त्यामुळे गटई कामगारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.



## पोलिसांच्या सतर्कतेमुळे चिमुकला सुखरूप घरी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल पोलीस ठाणे हद्दीत एकटा आढळून आलेल्या १० वर्षीय मुलाचा तत्परतेने शोध घेत पनवेल पोलिसांनी त्याला सुखरूपपणे त्याच्या आई-वडिलांच्या स्वाधीन केले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे काही काळ चिंतेत असलेल्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कु. साहिद खान (वय १० वर्षे, रा. कळवा नाका, ठाणे) हा मुलगा पनवेल पोलीस ठाणे हद्दीत एकटा आढळून आला. पोलिसांनी त्याच्याशी संवाद साधत त्याच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्याच्या पालकांचा शोध घेण्यास सुरुवात केली.पोलिसांच्या प्रयत्नांतून साहिदच्या पालकांशी संपर्क साधण्यात यश आले. त्यांना तत्काळ पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. पालक पोलीस ठाण्यात आल्यानंतर आवश्यक खात्री करून साहिद खान याला त्याच्या आई-वडिलांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले.या कारवाईमुळे साहिदच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला.

# विभाग प्रमुखांच्या बैठकीत जलद गतीने कामे करण्याचे आयुक्तांचे आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकास कामांबरोबरच आगामी गणोशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विभागवार आढावा आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकित आयुक्त मंगेश चितळे यांनी घेतला. यावेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य लेखाधिकारी पूनम पाटील, उपायुक्त डॉ वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त मंगला माळवे, सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे, शहर अभियंता राजेश कर्डिले, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, कार्यकारी अभियंता विलास चव्हाण, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, लेखाधिकारी संग्राम ऱ्होरकाटे, चारही प्रभागाचे अधिक्षक, महापालिका अधिकारी, सर्व विभागप्रमुख, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये 'आपले सरकार' व पीजी पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचा आढावा घेण्यात आला. यासोबतच गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने कृत्रिम तलावांची तयारी, मिरवणूक मार्गावरील रस्ते दुरूस्ती करण्याविषयी आयुक्तांनी संबधित विभागास सूचना दिल्या.

पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर साथरोगांना आळा घालण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या. याचबरोबर अतिक्रमण व अनधिकृत होर्डिंगविरोधातील कार्यवाही, धोकादायक इमारतींबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजना याचा आढावा घेण्यात आला.

महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये सुरू असलेल्या विकास कामांना गती देणे, नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणे आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करण्याच्या दृष्टीने ही आढावा बैठक महत्त्वपूर्ण ठरली.



# सीकेटी विद्यालयात संस्कृत दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे या वर्षी ही संस्कृत दिन सी.के.टी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात साजरा करण्यात आला. संस्कृत हा विषय गेले कित्येक वर्ष इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिकवला जातो. या विषयाबद्दल तसेच आपल्या परंपरेचा सन्मान वाढवा व संस्कृत भाषेचे संवर्धन, संरक्षण या हेतूने विद्यालयात हा दिवस साजरा केला जातो.

या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी ८वी ते १०तील संस्कृत विषयाच्या विद्यार्थ्यांनी पार पाडली . कार्यक्रमाची सुरुवात संगीत शिक्षक रुपेश मढवी सर, खरे सर आणि विद्यार्थी वृंद यांच्या ईशस्तवन आणि स्वागत गीताने करण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून स्मिता हर्डीकर (संस्कृत शिक्षिका तसेच निवृत्त पर्यवेक्षिका, के.व्ही.कन्या शाळा, पनवेल) तसेच इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पूर्वप्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, इयत्ता सातवीच्या पालक प्रतिनिधी सदस्य मुक्ताई कांबळे, सातवीचे वर्गशिक्षक सरोज जितेकर, प्रमोद शेळके, अश्विनी म्हात्रे, संस्कृत शिक्षिका शाल्वी ठाकूर उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या संभवी चवरे आणि आर्या पवार या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी कथा कथन – गोवर्धनधारण कथा, – रामस्तुति, गीत– नर्मदाष्टकम् स्तोत्र पठण, संस्कृतमध्ये वर्णन केलेल्या संस्कृतीच्या पैलूंवर भाषणे,आणि मोबाइलच्या अतिवापराच्या गैरसोयींवर छोटे नाटक तसेच नृत्य – एकदन्ताय वक्रतुण्डाय ...आणि प्रणवालयम् सादर केले .



यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्या यांनी संस्कृत भाषेची रचना व महत्त्व, संस्कृत भाषेत दर्शविलेली आपली संस्कृती, भगवतगीतेचे महात्म्य विद्यार्थ्यांना पटवून दिले. मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाचे महत्व अधोरेखित करून सांगितले.

विद्यार्थ्यांनी पूर्णतः संस्कृतमधून हा कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमात इयत्ता ८,९,१०वी चे सर्व संस्कृत विषयाचे विद्यार्थी सहभागी झाले.आभार प्रदर्शन व प्रास्ताविक संस्कृत शिक्षिका शाल्वी ठाकूर यांनी केले.

# राष्ट्रीय संशोधन स्पर्धेत सीकेटी महाविद्यालयाची दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या (अधिकारप्रदत्त स्वायत्त) सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी हवामान बदलाबाबतची चिंता प्रत्यक्ष पर्यावरणीय कृतीत रूपांतरित करण्याचा विधायक संदेश देणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील बहुविद्याशाखीय आंतरमहाविद्यालयीन युवा संशोधन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुंबईतील श्रीमती पी.एन. दोशी महिला महाविद्यालयात १ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभिनव संशोधन प्रकल्पाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक आणि चार हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले.



'चिंतेपासून कृतीकडे : हवामान बदल आणि युवकांची सक्रिय भूमिका' या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेत महाविद्यालयाचे आलोक सिंग, कस्तुरी मनेवे आणि आकांक्षा ताम्हणकर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी 'चिंताग्रस्त; पण सक्रिय हवामान बदलाबाबतची चिंता आणि कृतीशीलता समजून घेताना : परिवर्तनासाठी युवकांची भूमिका' या विषयावर संशोधन प्रकल्प सादर केला.

या संशोधनाचे वैशिष्ट्य म्हणजे हवामान बदलाच्या समस्येकडे केवळ भीती किंवा चिंतेच्या दृष्टीने न पाहता, त्यावर कृती करण्याची क्षमता युवकांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पर्यावरणीय प्रश्नांच्या अभ्यासासाठी संशोधन, माहितीचे विश्लेषण, आधुनिक तंत्रज्ञान आणि युवकांचा सक्रिय सहभाग यांचा प्रभावी मेळ या प्रकल्पात साधण्यात आला. या अभिनव आणि कृतीशील दृष्टिकोनाची दखल घेत परीक्षकांनी प्रकल्पाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक दिले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचेपदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख व विज्ञान विभाग प्रमुख डॉ.बी.डी. आघाव, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.एन.सी. वडनेरे व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# 'सीकेटी'च्या सहशिक्षिका अनिता पाटील यांचा सेवापूर्ती गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षिका अनिता पाटील यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा विद्यालयात ३१ ऑगस्ट रोजी संपन्न झाला. या सेवापूर्ती गौरव समारंभासाठी अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सत्कारमूर्ती अनिता पाटील व त्यांचे पती प्रशांत पाटील या उभयतांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.



सेवापूर्ती सोहळ्यात उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी, अनिता पाटील या सर्वांसाठी 'बडी बहना' आहेत, त्यांना आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभू दे व सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण होऊ दे, अशा शुभेच्छा दिल्या.अनिता पाटील यांचे सर्व सहकारी शिक्षक व शिक्षिकांनी त्यांच्याविषयी व्यक्त केलेली मनोगते लिहिलेली स्मरणिका सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या हस्ते प्रकाशित केली. सहशिक्षिका पल्लवी करपे यांनी 'जीवन गाणे गातच राहावे' हे गीत सादर केले.

यावेळी अनिता पाटील म्हणाल्या की, माझ्या सेवेमध्ये माझ्या कुटुंबाने तसेच सीकेटी परिवाराने खूप सहकार्य केले. माझ्या वडिलांनी शेवटपर्यंत सेवा करण्याची प्रेरणा दिली. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर या सर्वांविषयी त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी अध्यक्षीय भाषणात अनिता पाटील यांना सेवापूर्तीच्या शुभेच्छा दिल्या.

# तळोजा मजकूर येथील रस्त्याची नगरसेवक परेश ठाकूर यांनी केली पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा मजकूर येथील आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याची समस्या नागरिकांना भेडसावत होती. या गंभीर समस्येची दखल घेत प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी शुक्रवारी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन रस्त्याची पाहणी केली.

त्याचबरोबर आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तळोजा मजकूर येथील तलावाचीही पाहणी करून गणेशभक्तांच्या सोयीसाठी आवश्यक त्या कामांच्या सूचना प्रशासनाला दिल्या.



तळोजा मजकूर परिसरातील रस्ते आणि गणेशोत्सवाच्या दृष्टीने विसर्जन स्थळांची पाहणी करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या पाहणी दौऱ्यात नगरसेवक नितेश पाटील, दिनेश खानावकर, नगरसेविका विजयश्री पाटील, संतोष पाटील, शहर अभियंता राजेश कर्डीले यांच्यासह महापालिकेचे इतर संबंधित अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

आदिवासी वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, तसेच आगामी गणेशोत्सवादरम्यान गणेशमूर्ती विसर्जनासाठी तलाव परिसरात स्वच्छता, पुरेशी रोषणाई आणि सुरक्षेच्या उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, असे निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## संपादकीय

# उत्सवाचा आनंद जपूया

उत्सवाचा आनंद कमी न करता त्याचे स्वरूप अधिक पारंपरिक करण्याला कुणाचाच विरोध असणार नाही. सामाजिक सुधारणा या आदेशांमधून होत नाहीत. कायदा आवश्यक असतो, पण कायद्यापेक्षाही अधिक प्रभावी असते ती समाजाच्या स्वयंप्रेरणेतून येणारी शिस्त. आपल्या गणेशोत्सवात तर ही शिस्त कायमच दिसत आलेली आहे.

**गणेशोत्सव म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा उत्सव. सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यामागे लोकमान्य टिळकांचा उद्देश समाजाला एकत्र आणणे, जनजागृती करणे आणि राष्ट्रभावना जागवणे हा होता. त्यामुळे या उत्सवाच्या परंपरेचा विचार करताना व ती जतन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना आपण या उत्सवाचे स्वरूप सामाजिक जबाबदारीपासून वेगळे करू शकत नाही. म्हणूनच गणेशोत्सवातील कर्णकर्कश ध्वनिप्रदूषणाचा विचार केवळ 'डीजे हवा की नको' या चौकटीत करता कामा नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच पुणे येथे झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत यासंदर्भात घेतलेली भूमिका लक्षात घेण्याजोगी आहे. 'डीजे वाजला पाहिजे की नाही' या वादात न पडता पुणेकरांनी संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करून महाराष्ट्रासमोर आदर्श निर्माण करावा असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. हे आवाहन बंदीपेक्षा व्यापक विचार मांडणारे आहे. उत्सव जास्तीत जास्त पारंपरिक पद्धतीने साजरा केला तर त्याचे महत्त्व अधिक असते. त्यामुळे लोकांच्या सहभागानेच हे उच्च क्षमतेच्या ध्वनीचे स्तोम कमी झालेले दिसेल. आता एकंदरच सर्वधर्मीय उत्सवांमधील ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न चर्चिला जातो आहे. मोठ्या क्षमतेच्या कर्णकर्कश आवाजाचा दुष्परिणाम कुणालाच दुर्लक्षित करता येणार नाही. लहान मुलांची व वृद्धांची झोप, त्यांच्या श्रवणक्षमतेवर होणारे परिणाम, नागरिकांना जाणवणारी अस्वस्थता आणि आजारी व्यक्तींसाठी तर मोठ्या आवाजाचा त्रास अधिक गंभीर ठरू शकतो. रुग्णालये, निवासी परिसर आणि शांतता क्षेत्रांच्या आसपास तर यासंदर्भात संवेदनशीलता बाळगणे अगदीच आवश्यक आहे. आपल्या जल्लोषामुळे एखाद्या आजारी व्यक्तीची रात्र अस्वस्थ होत असेल तर त्या जल्लोषाचा पुनर्विचार गणेशभक्त करणार नाहीत का? नागपूर पोलिसांनी डॉल्बी, प्लाझ्मा आणि उच्च क्षमतेच्या ध्वनियंत्रणांवर बंदी घातली आहे. सामान्य ध्वनियंत्रणांना कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेत मुभा आहे. पनवेल परिसरातही पोलिसांनी सार्वजनिक गणेशोत्सवात डीजेचा वापर टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्णांना कर्णकर्कश आवाजाचा त्रास होऊ नये हाच त्यामागचा हेतू आहे. उत्सवामुळे होणारी वाहतूक कोंडी, कचरा आदींबाबतही समाजाने स्वतःहून विचार करणे अपेक्षित आहे. त्यासाठी सातत्याने जनजागृती, संवाद आणि सकारात्मक वातावरण निर्माण करावे लागेल. कायद्याने किंवा आदेशांमधून संबंधित परिवर्तन घडून येण्यापेक्षा समाजाच्या सहकार्यातूनच ते सहजतेने घडून येईल. गणेशोत्सवाची ओळख आवाजाच्या तीव्रतेने नव्हे, तर त्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक आशयाने व्हायला हवी. ढोल-ताशे, भजन, आरती, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम यांच्या माध्यमातूनही उत्सव उत्साहात साजरा होऊ शकतो. आवाजाची स्पर्धा नको, संस्कृती जपण्याची स्पर्धा हवी. हिंदू धर्माची परंपरा मुळातच सुधारणावादी आहे. काळानुरूप अनिष्ट रूढींचा त्याग करून समाजहिताला पूरक मूल्यांचा स्वीकार करण्याची प्रदीर्घ परंपरा आपण जपली आहे. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाविरोधातील जागरूकता ही आपल्या धार्मिक परंपरांना विरोध करणारी नसून, समाजहित, संवेदनशीलता आणि आत्मपरीक्षण यांना महत्त्व देणारी आहे.**

# गोपाळकाला : सांस्कृतिक आणि सामूहिक ऊर्जेचा उत्सव

महाराष्ट्र ही संतांची, संस्कृतीची आणि उत्सवांची भूमी आहे. येथे प्रत्येक सण हा केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर सामाजिक एकात्मतेचा आणि आनंदाचा सोहळा म्हणून साजरा केला जातो. या सर्व सणांमध्ये श्रावण महिन्यातील वद्य अष्टमीला येणारी 'कृष्ण जन्माष्टमी' (गोकुळाष्टमी) आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी (श्रावण वद्य नवमीला) साजरा केला जाणारा 'गोपाळकाला' म्हणजेच 'दहीहंडी' या उत्सवाचे स्थान अत्यंत अढळ आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा सण केवळ एका धार्मिक घटनेचे प्रतीक नसून तो तरुणाईचा उत्साह, अंगातील कौशल्य, सामूहिक शक्ती आणि सामाजिक समतेचा एक अप्रतिम आविष्कार आहे.

या सणाची पाळेमुळे द्वापारयुगातील भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांशी जोडलेली आहेत. गोकुळाष्टमीच्या दिवशी मध्यरात्री श्रीकृष्णाचा जन्म झाला आणि त्यानंतर गोकुळात आनंदात्सव साजरा झाला. या आनंदाच्या दुसऱ्याच दिवशी बालकृष्णाने आपल्या सवंगड्यांसोबत केलेल्या लीलांची आठवण म्हणून गोपाळकाला खेळला जातो. त्या काळात गोकुळात कंस राजाच्या जाचाला कंटाळलेले लोक आणि तिथली लहान मुले उपाशी राहू नयेत, म्हणून श्रीकृष्ण गावकऱ्यांच्या घरचे दूध, दही आणि लोणी चोरून खात असे. कंसाचे सैनिक हे लोणी जप्त करून मथुरेला घेऊन जाऊ नयेत आणि मुलांचा हात पोहोचू नये, म्हणून गोकुळातील माता लोण्याच्या हंड्या घराच्या छताला किंवा उंचावर शिंक्याला टांगून ठेवत असत, परंतु, चतुर आणि पराक्रमी बालकृष्णाला या उंचावरील हंड्यांपर्यंत पोहोचण्यापासून कोणीही रोखू शकत नव्हते.

श्रीकृष्ण आपले मित्र म्हणजेच पेंद्या, सुदामा आणि इतर गोपाळांना एकत्र करायचा. सर्व मित्र एकमेकांच्या पाठीवर आणि खांद्यावर उभे राहून मानवी मनोरा (पिरामिड) रचायचे आणि सर्वात वर चढून श्रीकृष्ण ती दही-लोण्याची हंडी फोडायचा. हंडी फुटल्यानंतर त्यातील दही-लोणी खाली पडायचे आणि सर्व सवंगडी तो प्रसाद आनंदाने ग्रहण करायचे. गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी घडलेल्या या ऐतिहासिक आणि भक्तीमय बाललीलेची आठवण म्हणून दरवर्षी हा सण साजरा केला जातो.

'गोपाळकाला' या शब्दाची फोड केल्यास त्याचा सुंदर अर्थ समोर येतो. 'गोपाळ' म्हणजे



गाईंचे पालन करणारा म्हणजेच श्रीकृष्ण आणि 'काला' म्हणजे एकत्र मिसळणे किंवा एकत्र करणे. भगवान श्रीकृष्णाने बालपणी गोकुळात आपल्या सवंगड्यांसोबत एकत्र येऊन, प्रत्येकाच्या घरून आणलेली शिदोरी, दूध, दही, लोणी, पोहे एकत्र करून जो प्रसाद तयार केला आणि सर्वांना वाटला, त्याला 'काला' म्हटले जाते. हा काला समतेचे प्रतीक आहे. यामध्ये कोणताही लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असा भेद नसतो. सर्वांचे अन्न एकत्र करून ते आनंदाने खाणे म्हणजेच गोपाळकाला.

महाराष्ट्रात, विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे आणि कोकण भागात गोपाळकाल्याचा उत्साह गगनात मावेनासा असतो. या दिवशी रस्त्या-रस्त्यांवर, चौकाचौकात उंचच उंच दहीहंड्या बांधल्या जातात. या हंड्यांमध्ये दही, दुध, लोणी, लाह्या, फळे आणि फुलांचे हार घातलेले असतात. या हंड्या फोडण्यासाठी तरुण मुलांचे, ज्यांना 'गोविंदा पथक' म्हटले जाते, गट तयार होतात. हे गोविंदा पथक महिना-दोन महिने आधीपासून मानवी मनोरे रचण्याचा सराव करत असतात. अत्यंत शिस्त, तोल (balance) आणि अचूक टायमिंग साधून हे पथक एकावर एक थर रचतात. सात, आठ, नऊ आणि काही ठिकाणी तर दहा थरांचे मनोरे रचून उंचावरील दहीहंडी फोडली जाते. हंडी फुटताच "गोविंदा रे गोपाळा", "यशवंती कीर्तिवंती", "बोल बजरंग बली की जय" अशा जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून जातो. हंडीच्या अवतीभवती असणारे लोक या गोविंदांवर पाण्याचे कारंजे उडवतात, ज्यामुळे वातावरणात प्रचंड उत्साह आणि चैतन्य निर्माण होते.

गोपाळकाला हा सण आपल्याला जगण्याचे खूप मोठे तत्त्वज्ञान शिकवतो. श्रीकृष्णाने काल्याच्या माध्यमातून जगाला 'समतेचा' संदेश दिला. जेव्हा सर्व सवंगड्यांचे अन्न एकत्र आले, तेव्हा तिथे जात, पात, आर्थिक स्तर हे सगळे गळून पडले. आजच्या आधुनिक काळातही दहीहंडी हा सण सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यास मोठी मदत करतो. एका गोविंदा पथकात वेगवेगळ्या जातीचे, धर्माचे आणि आर्थिक स्तरातले तरुण एकत्र येतात. मनोरा रचताना सर्वात खालच्या थरावर कोण आहे आणि सर्वात वर कोण चढत आहे, यापेक्षा "आपल्याला मिळून हंडी फोडायची आहे" हे एकच ध्येय सर्वांच्या मनात असते. एकमेकांवर असलेला विश्वास आणि सुरक्षिततेची भावना यामुळे सामाजिक सलोखा मजबूत होतो.

आधुनिक व्यवस्थापन शास्त्रामध्ये (Management) दहीहंडी या खेळाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाऊ शकते. हा खेळ आपल्याला अनेक गोष्टी शिकवतो.

* सांघिक भावना (Teamwork) : कोणताही एक व्यक्ती एकटा हंडी फोडू शकत नाही. त्यासाठी प्रत्येकाचे सहकार्य आवश्यक असते.
* नियोजन आणि सराव (Planning and Practice) : अनेक थरांचे मनोरे रचण्यासाठी अचूक नियोजनाची आणि कठोर परिश्रमाची गरज असते.
* नेतृत्व गुण (Leadership) : पथकाचा प्रमुख आपल्या सहकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करतो आणि त्यांचा उत्साह वाढवतो.
* जोखीम व्यवस्थापन (Risk Management) : उंचावरून पडण्याची भीती असतानाही स्वतःवर नियंत्रण ठेवून ध्येय गाठणे हे साहस या सणातून दिसून येते.

काळाच्या ओघात गोपाळकाला या सणाचे स्वरूप खूप बदलले आहे. पूर्वी हा सण गल्लीबोळापुरता मर्यादित होता. आज त्याला मोठ्या उत्सवाचे आणि क्रीडा प्रकाराचे स्वरूप आले आहे. अनेक राजकीय नेते आणि संस्था कोट्यवधी रुपयांची बक्षिसे या दहीहंडी स्पर्धांसाठी ठेवतात. स्पेनमधील 'कास्टेल्स' या मानवी मनोऱ्यांच्या खेळाशी याची तुलना केली जाते. महाराष्ट्र शासनाने दहीहंडीला 'साहसी खेळ' म्हणून अधिकृत मान्यता दिली आहे, ज्यामुळे या खेळातील खेळाडूंना (गोविंदांना) शासकीय सवलती आणि विमा संरक्षण मिळण्यास मदत झाली आहे.

आव्हाने आणि सुरक्षिततेचे महत्त्व

सणाचे स्वरूप मोठे होत असतानाच काही आव्हानेही समोर आली आहेत. बक्षिसांच्या हव्यासापोटी अनेकदा सुरक्षेकडे दुर्लक्ष केले जाते. उंचावरून पडून गोविंदा जखमी होणे किंवा काहींना आपला जीव गंवावा लागणे, अशा दुर्दैवी घटना घडतात. यासाठी आता न्यायालयाने आणि शासनाने काही कडक नियम लागू केले आहेत.

१. चौदा वर्षांखालील मुलांना मनोऱ्यात सहभागी करून घेण्यास बंदी घालण्यात आली आहे.

२. मनोऱ्यांची उंची मर्यादित ठेवण्याचे आवाहन केले जाते.

३. गोविंदा पथकांसाठी हेल्मेट, चेस्ट गार्ड आणि खाली सेफ्टी मॅट्स (गाद्या) वापरणे बंधनकारक केले जात आहे.

उत्सवाचा आनंद घेताना मानवी जिवाची किमान किंमत सर्वात जास्त आहे, याचे भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे.

संत साहित्यातील गोपाळकाला

महाराष्ट्रातील संत परंपरेने गोपाळकाल्याला एक अध्यात्मिक आणि भक्तीमय रूप दिले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ यांनी आपल्या अभंगांमधून आणि गवळणींमधून गोपाळकाल्याचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात, "काल्याची शिदोरी आम्हा दिली ऋषिकेशी..." म्हणजेच संतांनी या काल्याला भक्ती आणि ज्ञानाचा प्रसाद मानले आहे. वारकरी संप्रदायात पंढरपूरच्या वारीची सांगता करताना किंवा कोणत्याही मोठ्या उत्सवाच्या शेवटी 'काला' केला जातो, ज्याचा अर्थ असा की आपण सर्व देवाचे लेकरू आहोत आणि आपल्यात कोणताही भेद नाही.

गोपाळकाला हा केवळ मातीचा हंडा फोडण्याचा सण नाही, तर तो मानवी मनातील अहंकार, द्वेष आणि भेदभावाचा हंडा फोडण्याचा उत्सव आहे. हा सण आपल्याला एकत्र येण्याची, संकटांवर मात करण्याची आणि आनंद वाटून घेण्याची प्रेरणा देतो. आजच्या धावपळीच्या आणि आत्मकेंद्री जीवनात गोपाळकाल्यासारखे सण माणसाला माणसाशी जोडण्याचे काम करतात. तरुणाईच्या अथांग ऊर्जेला सकारात्मक दिशा देणारा, साहसाचा थरार अनुभवणारा आणि संस्कृतीचा वारसा जपणारा हा गोपाळकाला सण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा खरा मुकुटमणी आहे.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# आता सर्व बिले भरा थेट व्हॉट्सॲपवर!

सध्या बिले भरण्यासाठी कोणत्याही कार्यालयात जाण्याची गरज नाही. आता आपण घरबसल्या ॲपच्या माध्यमातून



बिले भरू शकतो, पण अनेकजण वीज, पाणी, गॅस याची बिले भरण्यासाठी वेगवेगळ्या ॲप्सचा वापर करतात, पण आता ही सगळी बिले एकाच ठिकाणी भरता येणार आहेत. व्हॉट्सॲपने भारतात एक नवीन 'बिल पेमेंट्स' फीचर सुरू केले आहे. या फीचरमुळे वापरकर्त्यांना विविध बिले थेट व्हॉट्सॲपद्वारे भरता येतील.

आतापर्यंत व्हॉट्सॲपचा वापर प्रामुख्याने चॅटिंग, फोटो आणि व्हिडीओ शेअर करणे आणि कॉलिंगसाठी केला जात होता, पण आता कंपनी ॲपच्या पेमेंट फीचर्सचा विस्तार करत आहे. नवीन 'बिल पेमेंट्स' फीचरमुळे वापरकर्ते एकाच ॲपमधून आपली दैनंदिन बिले व्यवस्थापित करू शकतील.

व्हॉट्सॲपच्या या नवीन फीचरमुळे वापरकर्त्यांना वीज, पाणी, पाईप गॅस, फास्टॅग, विमा, क्रेडिट कार्ड बिले आणि कर्ज परतफेड यासह विविध बिले भरता येतात. हे फीचर भारत कनेक्ट नेटवर्कशी जोडलेले आहे, यामुळे वापरकर्त्यांना विविध बिलर्समधून निवड करण्याची मुभा मिळते, मात्र तुम्ही एखाद्या विशिष्ट कंपनीचे किंवा विभागाचे बिल तेव्हाच भरू शकता, जेव्हा ते या नेटवर्कवर उपलब्ध असेल. हे फीचर वापरणे अगदी सोपे आहे. आधी तुम्हाला तुमच्या फोनवर व्हॉट्सॲप उघडावे लागेल. त्यानंतर व्हॉट्सॲपच्या होम स्क्रीनवरील ₹ आयकॉनवर टॅप करा. तुम्हाला बिल पेमेंट्सचा पर्याय दिसेल. त्यावर टॅप केल्यानंतर, तुम्हाला ज्या बिलाचे बिल भरायचे आहे, ती श्रेणी निवडावी लागेल. समजा तुम्हाला विजेचे बिल भरायचे आहे, तर तुम्हाला वीज हा पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर, तुमचा वीज विभाग किंवा सेवा प्रदाता निवडा. तुम्हाला तुमचा ग्राहक क्रमांक किंवा खाते क्रमांक टाकावा लागेल. माहिती टाकल्यानंतर जर तुमचे बिल सिस्टीममध्ये उपलब्ध असेल, तर बिलाची रक्कम स्क्रीनवर दिसेल. त्यानंतर तुम्हाला बिलाची रक्कम आणि इतर माहिती तपासावी लागेल.

जे लोक दर महिन्याला अनेक बिले भरतात, त्यांच्यासाठी हे फिचर फायदेशीर ठरेल. आता वीज, पाणी किंवा गॅस बिलांसाठी वेगवेगळे ॲप्स उघडण्याची गरज कमी होईल. याव्यतिरिक्त पूर्वी वापरलेले बिलर्स व्हॉट्सॲपवर पुन्हा सहजपणे ॲक्सेस करता येतात, यामुळे पुढच्या वेळी बिल भरणे आणखी सोपे होते. हे फिचर अजूनही सर्वांच्या ॲपवर सुरू झालेले नाही.

# माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

शिक्षक ते राष्ट्रपतीपर्यंतचा प्रवास डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची आज जयंती. १९६२मध्ये ते देशाचे राष्ट्रपती झाल्यावर शिक्षक दिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. यानिमित्ताने डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनाशी संबंधित काही विशेष गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

तशी आपल्या देशात गुरु शिष्य परंपरा खूप जुनी आहे. आपल्या पौराणिक ग्रंथांमध्ये आणि लोककथांमध्ये याची अनेक उदाहरणे आहेत. शिक्षक दिन साजरा करण्याची परंपरा प्राचीन गुरू-शिष्य परंपरा म्हणून पाहिली जाते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपण आपल्या आध्यात्मिक आणि धार्मिक गुरूंची पूजा करतो. याच पद्धतीने शिक्षक दिन साजरा करण्याची परंपरा आहे. या दिवशी आपल्या शाळा-कॉलेज आणि इतर ठिकाणी शिक्षण देणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळते.

डॉ. राधाकृष्णन राष्ट्रपती या देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाल्यानंतर त्यांच्या विद्यार्थ्यांना गुरूंचा वाढदिवस थाटामाटात साजरा करायचा होता. हा दिवस राधाकृष्णन दिन म्हणून साजरा व्हावा असा सर्वांचाच हेतू होता. विद्यार्थ्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची परवानगी मागितली असता राधाकृष्णन म्हणाले की, माझा वाढदिवस साजरा करण्याऐवजी देशभरातील



## निमित्त

शिक्षकांच्या सन्मानार्थ हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केल्यास मला अधिक अभिमान वाटेल. अशा प्रकारे देशात प्रथमच ५ सप्टेंबर १९६२ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त शिक्षक दिनाची सुरुवात करण्यात आली.

डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी तामिळनाडूतील तिरुतानी गावात एका गरीब कुटुंबात झाला. ते लहानपणापासूनच अभ्यासात अतिशय हुशार होते. त्यांनी तत्त्वज्ञान या विषयात एमए केले आणि १९१६मध्ये मद्रास रेसिडेन्सी कॉलेजमध्ये तत्त्वज्ञानाचे सहायक प्राध्यापक म्हणून शिकवायला सुरुवात केली. काही वर्षांनी ते प्राध्यापक झाले. त्यांच्या अप्रतिम अध्यापन कौशल्यामुळे अनेक भारतीय विद्यापीठांव्यतिरिक्त कोलंबो आणि लंडन विद्यापीठानेही त्यांना मानक पदव्या बहाल केल्या. स्वातंत्र्यानंतर त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आणि पॅरिसमधील युनेस्को संघटनेच्या कार्यकारिणीचे अध्यक्षही ते बनले. १९४९ ते १९५२ या काळात त्यांनी रशियामध्ये भारताचे राजदूत म्हणूनही काम केले. यानंतर १९५२मध्ये ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती म्हणून निवडून आले आणि नंतर ते राष्ट्रपती झाले. पुढे त्यांना भारतरत्न देऊन सन्मानित करण्यात आले.

राधाकृष्णन हे शिक्षक होते, पण त्यांना सर्व काही अनावश्यक नियमांच्या बंधनात ठेवायचे नव्हते. अनेकदा ते २० मिनिटे उशिरा वर्गात यायचे आणि दहा मिनिटे आधीच निघून जायचे. वर्गात जे लेक्चर द्यायचे होते, ते २० मिनिटांत पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. वर्गात विनाकारण वेळ घालवणे त्यांना आवडत नसे. असे असूनही ते आपल्या विद्यार्थ्यांचे लाडके आणि आदरणीय शिक्षक राहिले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा असा विश्वास होता की, देशातील सर्वोत्कृष्ट विचार असलेल्या लोकांनीच शिक्षक व्हावे.


डॉ. राधाकृष्णन यांनी आपल्या लेख आणि भाषणांतून जगाला भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली, ज्यामुळे संपूर्ण जगाने त्यांच्या ज्ञानाचे आणि तात्विक आकलनाचे लोह मानले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# काळ्या मनुक्यांचे पाणी पिण्याचे फायदे



ड्रायफ्रुटसमधील 'मनुका' लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्याच आवडीच्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या गोड पदार्थांमध्येदेखील आपण आवर्जून मनुका घालतो.शरीरासाठी भरपूर लाभदायक मनुक्याचे पाणीसुद्धा तितकेच फायदेशीर ठरते.

* **पचन सुधारते** – काळ्या मनुक्यात फायबर भरपूर प्रमाणात असतात, जे तुम्हाला पचनास आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करतात. काळ्या मनुक्याचे भिजवलेले पाणी प्यायल्याने शरीरात फायबर चांगले शोषले जातात; ज्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते आणि पचनसंस्थासुद्धा हेल्दी राहते.
* **ऊर्जा वाढण्यास मदत** – मनुका साखर आणि कार्बोहायड्रेट्सचे नैसर्गिक स्रोत आहे; ज्यामुळे सकाळी शरीराला ऊर्जा देण्यास आणि तुमच्या चयापचयला सुरुवात करण्यास मदत करतात. याचबरोबर दिवसभर ऊर्जेची पातळी राखण्यास विशेषतः उपयुक्त ठरू शकतात.
* **लोह** – भिजवलेल्या काळ्या मनुकाचे पाणी रक्त निरोगी ठेवण्यासाठी आणि अशक्तपणा येऊ न देण्यासाठी आवश्यक असलेल्या लोहाचे एक उत्तम स्रोत आहे. नियमितपणे या पाण्याचे सेवन केल्यास थकवा कमी होण्यास मदत होते; ज्यामुळे हिमोग्लोबिनची पातळी कमी असलेल्या व्यक्तींसाठी पाणी विशेषतः फायदेशीर ठरू शकते.
* **अँटिऑक्सिडंट्स** – काळ्या मनुकामध्ये पॉलीफेनॉलसारखे अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण, जळजळ यांच्याशी लढण्यास मदत करतात. यामुळे एकूण आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होतो आणि वय वाढतानाही शरीर निरोगी राहण्यास मदत होते.
* **त्वचेच्या आरोग्याला आधार** – काळ्या मनुकामध्ये आढळणारी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स निरोगी व चमकदार त्वचेला हातभार लावू शकतात. हे घटक शरीरातील मुक्त रॅडिकल्सशी लढतात आणि कोलेजन तयार होण्यास मदत करतात; ज्यामुळे त्वचा ताणते (Elastic), ओलावाही टिकून राहतो आणि त्वचा निरोगी दिसते.
* **शरीर विषमुक्त राहते** – भिजवलेल्या काळ्या मनुकाच्या पाण्यात शरीर विषमुक्त करण्याचे गुणधर्म असतात दीर्घकाळासाठी मजबूत करण्याचा एक सोपा मार्ग आहे. सगळ्यात बेस्ट म्हणजे रात्रभर ८ ते १० काळे मनुके एक ग्लास पाण्यात भिजवा आणि सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा.

# मंगला एक्सप्रेसमध्ये १५ दिवसांच्या बाळाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

कोकणात जाणारी मंगला एक्सप्रेस या ट्रेनमध्ये शुक्रवारी छत्तीसगड ते कन्नूर असे प्रवास करणाऱ्या एका कुटुंबातील पंधरा दिवसांच्या बाळाचा तापाच्या आजाराने वीर गाव हद्दीत अचानक मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात आली.

छत्तीसगड ते कन्नूर असा प्रवास करणारे अल्लारखा त्यांची पत्नी व त्यांची दोन वर्षाची मुलगी आयफा आणि नुकताच पंधरा दिवसांपूर्वी झालेला मोहम्मद हसन हे कुटुंब मंगला एक्सप्रेसने प्रवास करत होते. पंधरा दिवसाचा मोहम्मद हसन याला गावावरून निघाल्यानंतर ताप भरला भुसावळ रेल्वेस्थानकावर या मुलावर उपचार करण्यात आले. त्यानंतर महाड तालुक्यातील वीर स्थानकावर काही



अंतरावर मंगला एक्सप्रेस आल्यानंतर या मुलाची हाल चाल बंद झाल्याने ट्रेनमधून या संदर्भात वीर रेल्वेस्थानकात माहिती देण्यात आली. सकाळी नऊ वाजण्याच्या दरम्यान ही ट्रेन वीरला थांबवून या मुलाला दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात रेल्वे प्रशासनामार्फत तपासणीसाठी आणण्यात आले, मात्र त्या ठिकाणी डॉ. अजिंक्य जाधव यांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

मिळालेल्या माहितीनुसार अल्ला रखा है मूळचे उत्तर प्रदेशचे राहणारे आहेत. त्यांची पत्नी छत्तीसगड येथील राहणारी आहे. अल्लारखा हे कन्नूर मध्ये एका गॅरेजमध्ये मोटर सायकल मॅकानिक आहेत. मृत मुलगा हा त्यांची पत्नीच्या गावी छत्तीसगड येथे जन्माला आला त्यानंतर अल्लारखा आपल्या पत्नी व दोन मुलांसह या मंगला एक्सप्रेसने २ सप्टेंबर रोजी छत्तीसगडवरून कन्नूर येथे जाण्यास निघाले होते दरम्यान ही घटना घडली आहे. दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अहवालानंतर रेल्वे पोलीस आर.एम. चव्हाण आणि होमगार्ड सिद्धांत मोरे यांच्यामार्फत या मुलाला शवविच्छेदनासाठी माणगाव येथे रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

# मोबाईल चेक केल्याबद्दल विचारल्याने महिलेच्या डोक्याचे केस कापले

**रसायनी : बातमीदार**

मोबाईल चेक केल्याबद्दल बोलल्याने रागातून महिलेच्या डोक्याचे केस कापले. म्हणून रसायनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत हकीकत अशी की तक्रारदार वैष्णवी मनोज पंचारिया व आरोपी पृथ्वीराज कुंदन सिंग छानवाला हे दोघे एकत्र राहत होते यावेळी तक्रारदार महिलेचा फोन आरोपीने चेक केला याचा राग तक्रारदार महिलेला आल्यावर व तिने दुसऱ्याचा मोबाईल चेक रायचा नसतो असे सांगितल्याने आरोपीत याला राग आला व त्याने तक्रार महिलेस हाताने मारहाण,शिवीगाळ केली व तिच्या डोक्याचे समोरील केस ट्रिमर ने कापले तिच्या मनात लज्जा उत्पन्न झाली याबाबत तिने तक्रार दाखल केली आहे .

याबाबत रसायनी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. याचा तपास पोलीस हवालदार पवार हे पोलीस निरीक्षक भुजबळ साहेब त्यांना मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांची विद्यमान मालक **सौ. वर्षा सुनिल पुंडगे व श्री. सदानंद संग्राम भिसे** यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल **श्री. अतुल कांतीलाल पाटील व सौ विभावरी अतुल पाटील व ईतर** यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक **सौ. वर्षा सुनिल पुंडगे व श्री. सदानंद संग्राम भिसे** यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

मिळकतीचे वर्णन–: **मौजे– पिरकोन (५५३३३९)**
**(ULPIN : 1647390518), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ११२/३<br>खाते क्रमांक :१४६० | १ | ०.४०.८०<br>पो.ख. ०.०७.०० | ५.८७ |
| | | एकूण क्षेत्र– **०.४७.८०** | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत साठे करार मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क, वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून १४ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक – ०४/०९/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०६
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१

# रोटरी क्लब, जय गिरोबा प्रतिष्ठानतर्फे गतिमंद मुलांच्या शाळेत दहीहंडी उत्सव

**रोहा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रोहा व श्री जय गिरोबा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेरणा मतिमंद मुलांची शाळा येथे श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे दहीहंडी व गोविंदा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी विद्यार्थ्यांसोबत गोविंदा खेळत आणि उत्सवाचा आनंद साजरा करताना उपस्थित सदस्यांनी मनस्वी आनंद अनुभवला. या विशेष मुलांसोबत अशा प्रकारचे उत्सव साजरे केल्यामुळे वर्षभर सामाजिक कार्य करण्यासाठी सदस्यांना नवी प्रेरणा व ऊर्जा मिळते, असे उपस्थितांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. गोविंदा व फराळ वाटपामुळे शाळेतील वातावरण आनंदमय झाले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष दिनेश जैन, सेक्रेटरी आशिष दळवी, राजू शहा, आशिष शहा, विक्रम जैन, सतीश महाडिक, हेमंत ठाकूर यांच्यासह क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# पंढरीनाथ म्हस्के यांचा पुरस्काराने सन्मान

**पाली : प्रतिनिधी**

मूळचे सुधागड (वावे) येथील व सध्या चिंचवड येथे ३० वर्षांहून अधिक काळ स्नेह फ्लोरिस्टच्या माध्यमातून कार्यरत असलेले प्रमाणित पुष्परचनाकार पंढरीनाथ तुकाराम म्हस्के यांना राष्ट्रीय पातळीवरील मानाचा फ्लॉरिस्ट्री ॲम्बेसेडर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



नवी दिल्ली येथील हॉटेल द तिओली, छत्तरपूर येथे नुकत्याच झालेल्या इंडियन फ्लोरिस्ट असोसिएशन (आयएफए)च्या आठव्या राष्ट्रीय अधिवेशनात उपाध्यक्ष श्रीकांत कनोई यांच्या हस्ते म्हस्के यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्ष आनंदकुमार, संस्थापक रणजित मंडल आदी मान्यवर उपस्थित होते.

या राष्ट्रीय सन्मानासोबतच म्हस्के यांची आयएफएच्या महाराष्ट्र प्रमुखपदी निवड झाली आहे. त्यांना यापूर्वी विविध पुरस्कार मिळाले आहेत. ते पुणे फ्लोरिस्ट असोसिएशनचे सचिव, स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानचे खजिनदार आणि सुधागड तालुका मराठा समाजाचे सक्रिय सभासद म्हणून कार्यरत आहेत.


## अर्जंट पाहिजेत

**पनवेल मधील कन्स्ट्रक्शन व्यवसायामधील एका नामवंत कंपनीसाठी ऑफिसमध्ये कामाकरिता खालील पदाकरिता भरती आहे.**

१) बिल्डींग कन्स्ट्रक्शन इंजिनियर (Civil) पद – १
Building Construction Engineer (Civil) – 1

२) सेल्स एक्झिक्युटिव्ह (स्त्री) पद – १
Sales Executive (Female) – 1

३) रिसेप्शनिस्ट कम अकाऊंटट (स्त्री) पद – १
Receptionist Cum Accountant (Female) – 1

४) ऑफिस बॉय पद – १
Peon – 1

संपर्क :– 8879595974


# विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी रिलायन्स फाउंडेशनचा पुढाकार

**धाटाव : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, तसेच लहान वयातच आरोग्यविषयक समस्या ओळखून त्यावर वेळीच योग्य उपचार करता यावेत, या उद्देशाने रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल, गिरगाव, मुंबई यांच्यावतीने चणेरा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात इयत्ता पाचवी ते दहावीतील तब्बल २१४ विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

उमेश सुर्वे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रिलायन्स फाउंडेशनचे हेड नागेश गावडे तसेच डॉ. तेजस्वीनी सिंग, डॉ. सुदर्शना वाघमारे आणि डॉ. पराग महापात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांची विविध प्रकारे आरोग्य तपासणी केली.

यावेळी विद्यार्थ्यांचा रक्तदाब, रक्तातील साखर, रक्तगट तसेच सर्वसाधारण शारीरिक तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक समस्या किंवा पुढील उपचारांची गरज आढळून आली, अशा विद्यार्थ्यांना मोफत औषधे तसेच आरोग्य कार्ड देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आरोग्याची प्राथमिक माहिती मिळण्याबरोबरच आवश्यक उपचाराबाबत मार्गदर्शनही मिळाले.

या उपक्रमाला जिल्हा परिषद सदस्य उर्वशी वाडकर, चणेरा सरपंच राजेंद्र इंदुलकर, खांबेरे सरपंच अतिष मोरे, खैरेखुर्द सरपंच मुजम्मील गीते, महालुंगे सरपंच संकेत जोशी यांची उपस्थिती लाभली. तसेच शाळेचे मुख्याध्यापक के. बी. पाटील, शिवसेना रोहा तालुका प्रमुख उद्देश वाडकर आणि शशीकांत दोरुगुडे उपस्थित होते.




## सावधान नोटीस

सदर सावधान नोटीसीने तमाम जनतेस असे कळवितो की,

आमचे अशिल सौ. रोहिणी अर्जुन पाटील रा. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड. यांची वडिलोपार्जित स्वरुपाची प्रत्यक्ष ताबेकबजा वहिवाटीतील खालील वर्णनाची जमिन मिळकत आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मोहो | २९ | २ | १–३५–००<br>०–०५–०० | २५.८१ |

सदर जमीन मिळकतीच्या वाटपाकरीत व ठरावाकरीता आमचे अशिलांनी त्यांचे वडील खंडू बाळु फडके व इतर यांचेविरुद्ध पनवेल येथील दिवाणी न्यायालयामध्ये रे.मु.नं. ३६६/२०२५ हा दावा दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल झाल्यानंतर खंडू बाळु फडके ... वगैरे यांनी आमचे अशिलांना त्यांच्या ०–१५–० गुंठे हिश्श्याबाबत कागदपत्र लिहून दिलेला आहे. त्यानुसार पनवेल येथील दिवाणी न्यायालयातील दावा तडजोडीने मिटवून घेण्याचे ठरले होते. मात्र आता खंडू बाळू फडके.... वगैरे हे ठरल्याप्रमाणे वागणूक ठेवीत नाहीत, तसेच पनवेल कोर्टात दावा तडजोडीने मिटविण्यास टाळाटाळ करीत आहेत. तसेच खंडू बाळू फडके हे आमचे अशिलांना डावलून दावा मिळकत तिन्हाईत इसमांना विक्री करण्याच्या बेतात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीशीर समजलेले आहे. सबब सदर सावधान नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

तरी ह्या नोटीसीने तमाम जनतेस असे कळविण्यात येते की, सदर जमीन मिळकत ही आमचे अशिलांच्या ताबेकब्जा वहिवाटीतील अविभाज्य हिश्श्यातील जमीन मिळकत असल्याने वरील जमिन मिळकतीत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये. तसे केल्यास होणाऱ्या परिणामांस संबंधीतास जबाबदार धरणेत येईल. ह्याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे तमाम जनतेसाठी ही सावधान नोटीस दिली.

**पनवेल**
**तारीख ०५/०९/२०२६**

**सही/–**
**ॲड. के. के. गोधंळी**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल – ९७६८३७३२५५**

## पनवेल महानगरपालिका,पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०९/३१५/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०४/०९/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**

**प्रति,**
श्री./श्रीमती. ----------------------------------------
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका,पनवेल.

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र.९, बुधवार दिनांक ०९/०९/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ०९, दिनांक ०९/०९/२०२६ ची विषयपत्रिका**

**१. मा.आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**

१. पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल येथील साई बाबा मंदिर ते हॉटेल आर्या (स्टेशन रोड) व संत सावतामाळी हॉल ते मुख्य कॉंक्रीटी रस्त्याच्या दोन्ही बाजुस जुने पावसाळी गटार तोडून नव्याने पावसाळी गटार व फुटपाथ बांधणे.

२. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १५, सेक्टर - ०८, खांदा कॉलनी येथील शिव मंदिर मधील विरंगुळा केंद्राची डागडुजी करणे.

३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -ड, प्रभाग क्र.१८ मधील जे.जे.वुड ते भुयारी मार्ग ते भु.क्र.८ए, सेक्टर -१२, खांदा कॉलनी (सी.के.टी. कॉलेज कॉर्नर) पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.

४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "क" प्रभाग क्र.१४ मधील भुखंड क्र.०४, सेक्टर - १६, नविन पनवेल (प.) या भूखंडावर पनवेल महानगरपालिकेचे "स्वराज्य" मुख्यालय इमारतीचे बांधकाम काम करणे. (टप्पा १ सुधारित)

५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "क" प्रभाग क्र.१४ मधील भुखंड क्र.०४, सेक्टर - १६, नविन पनवेल (प.) या भूखंडावर पनवेल महानगरपालिकेचे "स्वराज्य" मुख्यालय इमारतीचे अंतर्गत सजावट व इतर अनुषंगीक कामे करणे. (टप्पा २ सुधारित)

**(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र.२८६/३०८/२०२६
महापालिका भवन,पनवेल
दिनांक :- ०४/०९/२०२६.

**सही/–**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

# आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून चौक वाचनालयाला संगणक, सौरसंच वाटप

**खालापूर : प्रतिनिधी**

चौक येथील लोकमान्य टिळक मोफत वाचनालयला कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या आमदार निधीतून चौक वाचनालय येथे २ कॉम्प्युटर, सोलर साहित्याचे वितरण करण्यात आले.

गेली अनेक वर्षे चौक येथील वाचनालय वाचकांसाठी मोफत उपलब्ध असून त्याचा फायदा वाचकांना मिळावा ह्या उद्देशाने कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणूक प्रमुख नीलिमा निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत दोन संगणक व सोलर संच देण्यात आले यावेळी अध्यक्ष व वाचक यांनी नीलिमा डावखरे यांचे आभार मानले.यावेळी भाजपा सरचिटणीस दिपक बेहरे, कर्जत शहर सरचिटणीस अतुल बडगुजर, वाचनालय अध्यक्ष रजनीकांत शहा,उपाध्यक्ष ऐश्वर्या जोशी, सचिव सतीश आंबवणे,अशोक चौधरी,डॉ अपर्णा वाळिंबे,राजेश आंबवणे उपस्थित होते.




## पनवेल येथे तातडीने भरती

भरती पदे

लेखापाल (Accountant)

साईट इंजिनिअर (Site Engineer)

आर्किटेक्ट (Architect)

वकील (Lawyer)

कार्यालयीन कर्मचारी / लिपिक (Clerk)

अनुभवी उमेदवारांना प्राधान्य

स्थान: Panvel

संपर्क: +91 84518 27666

ईमेल:landmastergroup15@gmail.com

आपल्या करिअरला नवी दिशा!

# मुदत संपलेली सलाईन लावलेल्या रुग्णाचा मृत्यू

## प्रशासनाकडून तिघांचे निलंबन, महापौरांकडून दहा लाखांची मदत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात मुदतबाह्य सलाईन रुग्णाला लावण्याचा धक्कादायक प्रकार चार दिवसांपुर्वी समोर आला होता.त्या रुग्णाची प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना फोर्टीज रुग्ण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारा दरम्यान गुरुवारी (ता.३)सकाळी मृत्यू झाला आहे या घटनेने पुन्हा नवी मुंबई पालिकेच्या आरोग्य यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. या घटनेनंतर हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी रुग्णालयात झालेल्या प्रकारानंतर माहिती न दिल्याने महापौर सुजाता पाटील वैद्यकीय अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. प्रथमदर्शनी कामात झालेल्या हालगर्जीपणा पाहता फार्मासिस्ट दिपक नलावडे, परिचारीका सुरभी मोराटकर आणि मुख्य परिचारीका गिता केणी यांच्यावर निलबंनाची कारवाई प्रशासनाकडून करण्यात आल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ.म्हात्रे यांनी माहिती दिली.

> एक्सपायरी सलाईन लावलेल्या रुग्णाचा उपचारा दरम्यान मृत्यू झालेल्या गोपीराम खडसे यांच्या कुटुंबियांना आम्ही १० लाखांची भरपाई देणार आहोत. तर अशा घटना रोखण्यासाठी स्वतः लक्ष घालून रुग्णसेवेचा आढावा घेणार आहे.
>
> **–सुजाता पाटील, महापौर,नवी मुंबई पालिका**

गोपीराम खडसे वय (५० वर्ष) असे मयत मृत पावलेल्या इसमाचे नाव आहे. खडसे यांना ताप आला होता.त्यातच ते चक्कर येऊन पडल्याने त्यांना वाशीतील पालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ३१ ऑगस्ट रोजी खडसे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांना मुदतबाह्य सलाईन लावण्यात आल्याचे त्यांच्या मुलाच्या लक्षात येताच त्यांनी हा प्रकार डॉक्टरांच्या निदर्शनात आणून दिला. मुदतबाह्य सलाईनमुळे खडसे यांच्या अंगाला खाज आणि खोकला त्रास जाणवू लागल्याने व प्लेटलेटस कमी झाल्याने पुढील उपचारासाठी जवळच्या फोर्टिज रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

# नवी मुंबई भाजपची जिल्हा कार्यकारिणी बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**




नवी मुंबई भारतीय जनता पार्टीची जिल्हा कार्यकारिणी बैठक नेरुळ येथील शिरवणे विद्यालय व जुनिअर कॉलेज येथे जिल्हा अध्यक्ष डॉ.राजेश पाटील , महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी संपन्न झाली.

प्रारंभी ,भारत माता व पक्षाच्या संस्थापकांना अभिवादन करून संपूर्ण वंदे मातरम व महाराष्ट्र गीतांनी बैठकीची सुरुवात झाली. भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी महापौर सुजाता सुरज पाटील, सभागृह नेते सागर नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, आरोग्य समिती सभापती डॉ. जयाजी नाथ, ठाणे कोकण विभाग कार्यालय प्रमुख अभिजीत पेडणेकर, विजय घाटे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निकेतन पाटील तसेच आजी माजी नगरसेवक–नगरसेविका, मंडळ अध्यक्ष तसेच प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ठाणे कोकण विभाग कार्यालय प्रमुख अभिजीत पेडणेकर यांनी आगामी कार्यक्रम व प्रदेश कार्यकारणीत झालेले प्रदेशाध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांच्या भाषणाचा सारांश सांगितला, भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी युवा पिढीला वाईट व्यसनांपासून व मादक द्रव्यांपासून दूर ठेवले पाहिजे त्याकरिता देशव्यापी मोहीम हाती घेण्याचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले आहे. याचा उल्लेख प्रदेशाध्यक्ष यांनी आपल्या भाषणात केला त्याची माहिती त्यांनी प्रस्तावना करताना दिली. तसेच सप्टेंबर मध्ये होणाऱ्या 'मन की बात' कार्यक्रमाचे तयारी कशी करावी याचेही मार्गदर्शन केले.

त्यानंतर प्रदेश कार्यकारिणीत मंत्री आशिष शेलार यांनी मांडलेल्या "अपप्रचाराला विकास गाथा कथनाने उत्तर द्या" या राजकीय ठरावाचा सारांश सभागृह नेते सागर नाईक यांनी उपस्थितांना समजावून सांगितला. केंद्र सरकार, राज्य सरकार व महानगरपालिका या तिन्हीकडे आपली सत्ता असताना आपल्या योजना लोकांपर्यंत अधिकाधिक पोचण्याकरिता आपल्याला प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन त्यांनी केले. या प्रस्तावाला निकेतन पाटील यांनी अनुमोदन दिले. कोषाध्यक्ष विजय घाटे यांनी "युवाशक्ती, संधी आणि विकसित भारताचा संकल्प"या विषयावरील अभिनंदनाचा प्रस्ताव बैठकीसमोर मांडला. या अभिनंदन प्रस्तावाला मनीषा अंधांनसरे यांनी अनुमोदन दिले.

यानंतर अध्यक्षीय भाषणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रदेश कार्यकारिणीतील अभ्यासपूर्ण भाषणाचा सारांश जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील यांनी विशद केला. २०१४ ते २०२६ या कालखंडात देश कशातऱ्हेने प्रगतीपथावर आहे आणि त्यासोबतच महाराष्ट्र राज्य हे देखील देशाच्या आर्थिक व पायाभूत उभारणीत कसे महत्त्वाचे योगदान देत आहे तसेच विरोधक फेक नरेटीव वापरून आपल्या चांगल्या कामाचेही दिशाभूल करणारे वृत्त कसे पसरवतात व त्याला विकास गाथेच्या माध्यमातून कसे उत्तर द्यायचे त्याचे मार्गदर्शन सभेला केले.

'मन की बात' हा कार्यक्रम १००% बुथवर व्हावा अशी इच्छा सर्व कार्यकर्त्यांकडे व्यक्त केली. तसेच येत्या १५ सप्टेंबर रोजी वनमंत्री गणेश नाईक यांचा व १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस. १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर महिनाभरातील येणाऱ्या वाढदिवसांनिमित्त सेवा संपर्क अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याचे सांगीतले.

# भाजपच्या तुर्भे मंडळ प्रभारीपदी राजेश राय यांची नियुक्ती



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्ह्याच्या तुर्भे मंडळ प्रभारीपदी राजेश राय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि नवी मुंबई प्रभारी शशिकांत कांबळे यांनी राय यांच्यावर विश्वास व्यक्त करत त्यांना तुर्भे मंडळ प्रभारीपदाचे नियुक्ती पत्र दिले.या नियुक्तीप्रसंगी कोकण विभाग कार्यालय प्रमुख अभिजीत पेड़णेकर यांचीही उपस्थिती होती.

नवीन जबाबदारी मिळाल्यानंतर राजेश राय यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. संघटनेने सोपविलेली ही जबाबदारी केवळ पद नसून पक्ष, राष्ट्र आणि कार्यकर्त्यांप्रती समर्पणाचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.पक्ष नेतृत्वाने सोपविलेली जबाबदारी निष्ठा, प्रामाणिकपणा, समर्पण आणि मेहनतीने पार पाडत संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने काम करणार असल्याचा विश्वास राय यांनी व्यक्त केला. तुर्भे मंडळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांचा कौशल्याधिष्ठित सर्जनशील प्रवास

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण–कोपर येथे रयत शिक्षण संस्थेच्या 'गुरुकुल प्रकल्प २.०' अंतर्गत'कौशल्याधिष्ठित शिक्षण' या संकल्पनेवर आधारित मातीकाम व मूर्तीकला प्रशिक्षणाचा अभिनव उपक्रम उत्साहात घेण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांच्या सर्जनशीलतेला वावमिळावा आणि शिक्षणासोबत प्रत्यक्ष जीवनोपयोगी कौशल्ये आत्मसात करता यावीत, या उद्देशाने याप्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या अंतर्गत विविध शाखांमध्ये'गुरुकुल २.०' हा उपक्रम कार्यान्वित करण्यात आला असून, त्याच अनुषंगाने विद्यालयाच्या प्राचार्य सौ.ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी या उपक्रमाचा शुभारंभकरण्यात आला. यावेळी इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना मातीकामाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.



या प्रशिक्षणासाठी विद्यालयाचा माजी विद्यार्थी मंगेश कोळी यांनी विशेष पुढाकार घेतला. आज एक कुशल व प्रसिद्ध मूर्तिकार म्हणून कार्यरतअसलेल्या मंगेश कोळी यांनी आपल्या शाळेशी असलेले ऋणानुबंध जपत स्वतःहून विद्यालयात येऊनविद्यार्थ्यांना मूर्तीकलेचे प्रशिक्षण देण्याची इच्छा व्यक्त केली होती.

त्यानुसार विद्यार्थ्यांनापर्यावरणपूरक मातीपासून विविध आकर्षक मूर्ती कशा तयार कराव्यात, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासहप्रशिक्षण दिले.माती मळण्यापासून मूर्तीला आकार देण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवली.उपलब्ध साहित्याचा कल्पकतेने वापर करत विद्यार्थ्यांनी विविध मूर्ती साकारल्या. मातीकामाची आवडअसलेल्या विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांना वाव दिला.

या प्रशिक्षणाला विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील तसेच लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, सेवानिवृत्त लेखनिक चंद्रकांत मढवी यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कलाशिक्षक गणेश भोईर, प्रतिज्ञा घरत यांनी सहकार्य केले.

# चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ९६व्या हुतात्मा स्मृतिदिन पूर्वतयारीची नियोजन बैठक

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील देशासाठी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती अर्पण करणाऱ्या २५ सप्टेंबर १९३० च्या चिरनेर जंगल सत्याग्रहातील शूरवीर स्वातंत्र्य विरांचा अभिवादन सोहळा, रायगड जिल्हा परिषद, उरण पंचायत समिती व चिरनेर ग्रामपंचायत आणि चिरनेर ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने, ऐतिहासिक चिरनेर गावात २५ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येणार आहे.

या ९६व्या चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या हुतात्मा स्मृतीदिन अभिवादन सोहळ्याचे नेटके नियोजन कसे असावे यासाठी कार्यक्रमाच्या नियोजनाच्या पूर्वतयारीची दिशा ठरविण्यासाठी काल ३ सप्टेंबर रोजी चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच भास्कर मोकल यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय स्थानिक कार्यकर्त्यांच्या व ग्रामस्थांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली.



या बैठकीत चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या हुतात्मा अभिवादन सोहळ्याच्या कार्यक्रमाविषयी सविस्तर चर्चा करून, कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात आली. यात प्रामुख्याने सदर कार्यक्रम हा सर्वपक्षीय नेतेमंडळींच्या व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात यावा, असा बैठकीत अनेकांनी मुद्दा उपस्थित केला. या अभिवादन सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले भूषविणार असल्याचे निश्चित केले आहे. तर खासदार श्रीरंग आप्पा बारणे व रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांची प्रमुख असल्याचे बैठकीत जाहीर करण्यात आले. अभिवादन सोहळ्यात हुतात्म्यांना पोलीस दलातर्फे शासकीय इतमात प्रत्येकी बंदुकीच्या तीन फैरी झाडून आदरांजली वाहण्यात येणार आहे.

ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाला योग्य ते सहकार्य करण्याचे आवाहन सरपंच भास्कर मोकल यांनी यावेळी केले. या बैठकीला चिरनेरचे पोलीस पाटील संजय पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, संतोष ठाकूर, सुरेश पाटील, निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल, ग्रामपंचायत सदस्य समीर डुंगीकर, समाधान ठाकूर, वनिता गोंधळी, निकिता नारंगीकर, जयश्री चिर्लेकर, निलम चौलकर प्रफुल्ल खारपाटील, पद्माकर फोफेरकर, सचिन घबाडी, ग्रामविकास अधिकारी रवींद्र गावंड यांच्यासह कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नवदृष्टी उपक्रमातून शिक्षकांना आरोग्याबाबत मार्गदर्शन




**उरण : रामप्रहर वृत्त**

शिक्षकांच्या शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आणि भावनिक आरोग्यालाही महत्त्व देण्याच्या उद्देशाने जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था, महाराष्ट्र होमिओपॅथिक फिमेल डॉक्टर्स असोसिएशन (MHFDA), पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'NAVDRUSHTI A New Vision for Holistic Health' या उपक्रमांतर्गत दि. २ सप्टेंबर रोजी हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

MHFDA च्या प्रदेशाध्यक्षा डॉ. रुपाली गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात शिक्षकांचे मानसिक आरोग्य, ताणतणावाचे व्यवस्थापन, भावनिक संतुलन आणि दैनंदिन जीवनातील अडचणींना प्रभावीपणे सामोरे जाण्याच्या व्यावहारिक पद्धती यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. प्रतिमा म्हात्रे यांनी शारीरिक आजार आणि मानसिक–भावनिक स्थिती यांच्यातील परस्परसंबंध तसेच होमिओपॅथिक उपचारपद्धतीचा दृष्टिकोन त्यांनी स्पष्ट केला.

MHFDA पनवेलच्या अध्यक्षा तथा मानसशास्त्रज्ञ डॉ. सोनाली जोशी यांनी 'Mental Health Awareness and Emotional Well-being' या विषयावर संवादात्मक सत्र घेतले. शिक्षकांना ताणतणाव, अतिविचार आणि भावनिक दडपण हाताळण्यासाठी उपयुक्त असलेल्या विविध व्यावहारिक पद्धतींची माहिती त्यांनी दिली.

> *विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. MHFDA पनवेलने 'नवदृष्टी'च्या माध्यमातून अत्यंत संवेदनशील आणि समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. वैद्यकीय ज्ञानाला सामाजिक बांधिलकीची जोड देऊन सुरू असलेले त्यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.*
>
> **–प्रितम म्हात्रे,** अध्यक्ष, जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था

कार्यक्रमाचे आयोजन MHFDA पनवेलच्या अध्यक्षा डॉ. सोनाली जोशी, उपाध्यक्षा डॉ. सोनल शेठ आणि सचिव डॉ. अशिता नांदगावकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कोअर कमिटी सदस्य डॉ. अक्षया ठाकूर, डॉ. सुलक्षणा माडे, डॉ. प्रतिमा म्हात्रे, डॉ. प्राजक्ता वायाळ, डॉ. विशाखा सुवर्णा तसेच MHFDA सदस्य डॉ. अश्विनी कोरे यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

# रिटघर विद्यालयात माता पालक मेळावा व मोफत गणवेश वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे गुरुवार (दि.३) रोजी मातापालक मेळावा व शालेय मोफत गणवेश वाटप करण्यात आले.

सदरप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे सर, पर्यवेक्षिका बाबर मॅडम, माता पालक प्रतिनिधी अनिता भोपी, उज्वला भोपी, लक्ष्मी गवाले, दर्शना शेळके, सारिका सुळे तसेच राहुल ड्रेसेसचे व्यवस्थापक धनंजय आंग्रे सर्व शिक्षक यांनी कर्मवीर अण्णांच्या व लक्ष्मी वहिनींच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच आलेल्या सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सदर प्रसंगी विद्यालयातील इयत्ता ५वीच्या विद्यार्थ्यांना ४३ शालेय मोफत गणवेश राहुल ड्रेसेस पनवेल तर्फे देण्यात आले. यानंतर माता–पालक मेळाव्याच्या निमित्ताने पर्यवेक्षिका. बाबर मॅडम यांनी मार्गदर्शन केले, तसेच माता प्रतिनिधी म्हणून दर्शना शेळकेयांनी आपले विचार व्यक्त केले , यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे सर यांनी आलेल्या सर्व माता पालक व ५ वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच या कार्यक्रमात इयत्ता ९ वी व १० वी च्या किशोरवयीन विद्यार्थिनींना जाधव मॅडम यांनीमुलींच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील ए.ए., व आभार गंधे मॅडम यांनी मानले.



# एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालयात जन्माष्टमी साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालयात जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व परंपरांविषयी प्रेम व जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्राचार्यांच्या हस्ते श्रीकृष्णाची पूजा करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

जन्माष्टमीच्या उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी उत्साहात विविध नृत्य व डान्स सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. श्रीकृष्णाच्या बाललीला आणि जन्माष्टमीच्या आनंदाचे दर्शन घडवणाऱ्या नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली.यानंतर विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने दहीहंडीचे थर रचून दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. एकजूट, संघभावना आणि उत्साहाचे दर्शन घडवत विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. दहीहंडी फुटताच विद्यार्थ्यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला.

# आर्थिक साक्षरता : सुरक्षित भविष्यासाठी पोस्ट ऑफिस बचत व गुंतवणूक मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, नवीन पनवेल, येथे "आर्थिक साक्षरता : सुरक्षित भविष्यासाठी पोस्ट ऑफिस बचत व गुंतवणूक'" या विषयावर विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता व मार्गदर्शन सत्राचे आयोजन ४ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास व जीवनशैली शिक्षण (DLLE) समितीच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयन असिस्टंट प्रोफेसर अनम मेहदिकर, आणि असिस्टंट प्रोफेसर डॉ. ममता भट्टाचार्जी यांनी केले.

या मार्गदर्शन सत्रासाठी पनवेल पोस्ट ऑफिसच्या असिस्टंट पोस्टमास्तर स्वाती सिसार्थ प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना पोस्ट ऑफिसच्या विविध बचत, गुंतवणूक आणि विमा योजनांची सविस्तर माहिती दिली. नियमित बचतीचे महत्त्व, आर्थिक नियोजन आणि योग्य गुंतवणुकीची निवड याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विविध योजनांची माहिती देताना त्यांनी दैनंदिन जीवनातील व्यावहारिक उदाहरणांचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना विषय समजण्यास अधिक सुलभता झाली.



सत्रामध्ये पोस्ट ऑफिसच्या विविध बचत व गुंतवणूक योजनांबरोबरच विमा योजनांवरही विशेष मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः "टपाल जीवन विमा' (PLI) संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. सुरक्षा, सुविधा आणि संतोष या PLI योजनांची वैशिष्ट्ये, त्यांचे फायदे तसेच आर्थिक संरक्षणाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच Children Policy बाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. भविष्यातील आर्थिक गरजा, कुटुंबाचे आर्थिक संरक्षण आणि नियोजनबद्ध बचतीसाठी विम्याचे महत्त्व यावरही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी आर्या कदम यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन प्रभावीपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी द्वितीय वर्ष बी.ए. एलएल.बी.च्या विद्यार्थिनी सुयेशा पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी प्रमुख मार्गदर्शक, महाविद्यालयाच्या प्राचार्या, DLLE समिती, समन्वयक प्राध्यापक आणि सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# गणेशोत्सवात साथरोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा परिषद सज्ज

## रायगडात धन्वंतरी आरोग्य अभियान राबविले जाणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी होत असते. अशा वेळी साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने धन्वंतरी आरोग्य अभियान राबविण्यात येणार आहे. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामपंचायती व संबंधित यंत्रणा समन्वयाने अभियान राबविणार आहेत.

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने चाकरमानी, नागरिकांची ये-जा सुरू असते. या काळात पावसाळी वातावरण, ठिकठिकाणी साचलेले पाणी, अस्वच्छता, डासांची पैदास होण्यास पोषक परिस्थिती निर्माण झाल्याने डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, अतिसार, कावीळ, टायफॉईड, लेप्टोस्पायरोसिस यांयारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता असते. त्यामुळेच उत्सवाच्या काळातही नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे व तातडीने उपचार मिळावेत यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने धन्वंतरी आरोग्य अभियान राबविण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील नागरिकांनी उत्साहाने व आरोग्यपूर्ण गणेशोत्सव साजरा करावा यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने दक्षता घेण्यात येत आहे. सर्व ग्रामीण, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालयात सर्व औषधसाठा तसेच वैद्यकीय टीम सज्ज असणार आहे. नागरिकांनी व गणेशोत्सव मंडळांनी आपले गणेशोत्सव काळात करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. दामोदर मोरे यांनी केले आहे.

**विशेष आरोग्य पथके**

मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांमध्ये विशेष आरोग्य पथक तैनात ठेवण्यात येणार आहे. या पथकाद्वारे प्राथमिक उपचार करण्यात येणार आहेत. गर्दीची ठिकाणी उदा. एसटी डेपो, बाजारपेठा, गणेश मंडळ परिसर अशा भागामध्ये स्वच्छतेच्या संदर्भात पाहणी, गर्दीच्या ठिकाणी औषध फवारणी, डेंग्यू व मलेरिया निदानासाठी आवश्यक तपासणी किट उपलब्ध करून योग्य ती खबरदारी घेण्यात येणार आहे.

**व्यापक जनजागृती**

ग्रामपंचायत स्पतरापासून जिल्हा स्तरावर आरोग्यसेवक, अंगणवाडी सेविका, आशासेविका यांच्यामार्फत साथीच्या रोगांची लक्षणे, त्यावरील उपचार, खबरदारीच्या उपाययोजना याबबात व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. गणेश मंडळांकडून ध्वनिक्षेपकावर साथरोगांबाबत माहिती देण्यात यावी तसेच सोश मीडियावर जनजागृती करण्यात येणार आहे.

**सार्वजिनक स्वच्छता**

सर्व गणेशात्सव मंडळांना त्यांच्या मंडप परिसरात पाणी साचू न देणे, कचऱ्याची नियमितपणे योग्य ती विल्हेवाट लावणे, स्वच्छता राखणे, पिण्याच्या पाण्याची शुद्धता राखणे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यासोबतच संबंधित ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिकांच्या सहाकार्याने स्वच्छता राखणे, पिण्याच्या पाण्याची तपासणी करून घेण्यासह मंडपांमध्ये जनजागृतीपर फलक लावण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## जंजिरा किल्ल्याच्या साफसफाईला सुरुवात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील जंजिरा किल्ल्याच्या साफसफाईला अखेर सुरुवात झाली आहे. किल्ल्याचे दरवाजे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पर्यटकांसाठी खुले होणार आहेत.

राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील जंजिरा किल्ला २२ एकरावर पसरला असून ४० फुट भिंतींनी वेढलेला आहे. हा किल्ला पाहण्यासाठी देश-विदेशातून दरवर्षी लाखो पर्यटक ये-जा करीत असतात. पावसाळी तीन महिन्यांत किल्ल्याच्या आतील आजूबाजूला भिंतीवर पाच ते सहा फूट उंचीने झाडे व गवत वाढल्याने या ठिकाणी सरपटणारे जीव असू शकतात. त्यापासून पर्यटकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

पर्यटकांच्या सुरक्षेच्या दुष्टीने पुरातत्व विभागाने किल्ल्याचे दरवाजे काही दिवस बंद ठेवून चारही बाजूला कामगार लावून साफसफाई सुरू केली आहे. अधूनमधून पाऊस पडत असल्याने सफाईला उशीर होत आहे. पुरातत्व बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांच्यासह १२ कर्मचारी हे काम करीत आहेत. आणखी कामगार वाढवून लवकरात लवकर किल्ल्याची साफसफाई करुन हा किल्ला लवकरच लवकर पर्यटकांसाठी खुला करावा याचे प्रयत्न आम्ही करत आहोत. साधारण सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किल्ल्याचे दरवाजे पर्यटकांसाठी खुले करणार असल्याची माहिती पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली.



## माणगावमध्ये आगरी समाजातील विद्यार्थी-शिक्षकांसह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुका आगरी समाज विभागीय शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, विविध क्षेत्रांतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारीवर्गाचा तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय व नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव व सत्कार समारंभ नुकताच झाला.



माणगाव येथे झालेल्या या कार्यक्रमास चित्रकार, कवी व साहित्यिक प्रकाश पाटील (पनवेल), पत्रकार टिळक खाडे, माणगाव तालुका आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष हनुमंत म्हात्रे, उपाध्यक्ष मेघना भगत, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव राजेंद्र भगत यांनी केले. यावेळी त्यांनी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. संस्थेचा वार्षिक अहवाल अरुण पाटील यांनी सादर करून वर्षभरात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेतला.

यानंतर शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये विविध इयत्तांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय व नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षक-शिक्षिकांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले तसेच नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या मुख्याध्यापक, सहाय्यक शिक्षक-शिक्षिका यांचाही शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. समाजासाठी योगदान देणाऱ्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांचाही यावेळी यथोचित गौरव करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी प्रकाश पाटील यांनी आगरी समाजाची संस्कृती, भाषा व संस्कार यांची जपणूक करण्याचे आवाहन केले. विविध क्षेत्रांत समाजबांधवांनी उल्लेखनीय कार्य करावे आणि त्यांच्या कार्याची दखल घेऊन समाजाच्या वतीने प्रोत्साहन देण्याची परंपरा सुरू ठेवावी, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमाचा आपल्याला सार्थ अभिमान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पत्रकार टिळक उमाजी खाडे यांनी आगरी समाजाची संस्कृती व परंपरा महान असून अतिथींचा आदर-सत्कार ही आगरी समाजाची खरी ओळख असल्याचे सांगितले. स्वराज्य व स्वातंत्र्याच्या लढ्यात आगरी समाजाचे योगदान मोलाचे असून समाजातून अनेक कर्तृत्ववान नेतृत्व व समाजसुधारक घडल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

मंडळाचे माजी अध्यक्ष राजन पाटील व माजी सचिव गजानन पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष हनुमंत म्हात्रे यांनी मंडळाच्या यशस्वी वाटचालीचा, विविध उपक्रमांचा तसेच संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला. त्यांनी कथारूपातून समाजाप्रती प्रत्येकाचे असलेले उत्तरदायित्व अधोरेखित करत उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्याधर जोशी व निलेश भोईर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मंडळाचे खजिनदार राजेश घरत यांनी मानले. कार्यक्रमास समाजबांधव, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाघोशी शाळेत इंग्रजी भाषा प्रयोगशाळेचे उद्घाटन

**पाली : प्रतिनिधी**

आजच्या डिजिटल आणि आधुनिक युगात मातृभाषेचा अभिमान बाळगण्यासोबतच इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवणे ही काळाची गरज बनली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजीचे अध्ययन आणि अध्यापन अधिक सोपे, रंजक व प्रभावी व्हावे यासाठी रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा वाघोशी येथे इंग्रजी भाषा प्रयोगशाळा प्रकल्प अंतर्गत इंग्रजी लॅबचे भव्य उद्घाटन नुकतेच उत्साहात पार पडले.

जिल्हा परिषद सदस्य शर्मिला बोडके यांच्या हस्ते या इंग्रजी लॅबचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, मराठी भाषेचा अभिमान बाळगणे व शिक्षण घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर डिजिटल युगात इंग्रजीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

### वैशिष्ट्ये अन् उपयुक्तता

***लॅबमधील अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांचा इंग्रजी संभाषण, ऐकणे, वाचन आणि लेखन या कौशल्यांचा सर्वांगीण विकास होईल. खेळाच्या व डिजिटल माध्यमांतून शिकायला मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील इंग्रजी भाषेची भीती दूर होऊन आत्मविश्वास वाढेल. आधुनिक दृकश्राव्य साधनांमुळे शिक्षकांना इंग्रजी व्याकरण व शब्दसंग्रह शिकवणे अधिक प्रभावी होईल.***

यावेळी शाळेच्या परसबागेत शर्मिला बोडके यांच्या हस्ते पेरूच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. यावेळी निपुण मातांचा विशेष सन्मान झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत आईचे योगदान महत्त्वाचे मानून, यावेळी पूजा गायकवाड, वनिता पवार, शीतल वाघमारे आणि रूपाली कोल्हटकर या 'निपुण मातां'चा पुष्पगुच्छ व वृक्षभेट देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

या सोहळयाला शरद बोडके यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच शशिकांत देशमुख, विकास देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कविता देशमुख, संचिता वाडेकर, रुपाली कोल्हटकर, पूजा गायकवाड, अरुणा देशमुख, आशा कार्यकर्त्या अनिता देशमुख, वनिता पवार, शितल वाघमारे यांच्यासह वाघोशी ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक राजेश जाधव, शिक्षक कीर्ती लामदाडे, सुवर्णा घोडे आणि जनार्दन भिलारे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिक्षक जनार्दन भिलारे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक राजेश जाधव यांनी मानले.

## तळा तालुक्यात विजेचा लपंडाव

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहर व तालुक्यास विजेच्या लंपडावाचा सामना करावा लागत आहे. यामुळे नागरिक त्रस्त झाले असून संताप व्यक्त करताना पहावयास मिळत आहे.

रायगड जिल्ह्यात तळा शाखा विज बिले भरण्यात एक नंबरवर आहे तसेच स्मार्ट मीटर बसविण्यास विद्युत मंडळांनी मोठी घाई केली असून बहुतेक ठिकाणी स्मार्ट मिटर बसविले आहेत. ज्या तत्परतेने महावितरणने स्मार्ट मीटर बसविले त्या पध्दतीची स्मार्ट वीज सेवा मात्र ग्राहकांना मिळताना दिसत नाही.

विजेच्या लंपडावामुळे व्यापारी, नागरिक व विद्युत ग्राहकांना, विद्यार्थ्यांना, लघु उद्योगांना याचा फटका बसत आहे. ऑगस्ट महिन्यात विजेच्या कमी जास्त दाबामुळे पुसाटी, कुंभार आळी, जोगवाडी भागात अनेक ग्राहकांचे टीव्ही, फ्रीज, पंखे जळून बंद पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक वस्तूंमधे बिघाड होत असल्याच्या घटनाही घडत असल्याच्या पहावयास मिळाले आहेत. साले इन्कमर त्वरित सुरू करण्यात यावा. त्याचे काम चालू आहे, जे लावकर होणे आवश्यक आहे. तालुक्यात फिडर व ट्रान्सफॉर्मर बसविण्याची आवश्यकता आहे. सध्या विद्युत मंडळाची डिपी बसविणे, तारा लावणे अशी कामे चालू आहेत.

तळा तालुका हा ग्रामीण व दुर्गम डोंगराळ असल्याने भौगोलिक परिस्थिती पहाता एक सबस्टेशन आहे. त्यांचे तळा व मांदाड असे दोन सबस्टेशन सुरू करावेत, म्हणजे कर्मचारीवर्गाला चांगले काम करता येईल, अशी मागणी होत आहे. त्याचप्रमाणे तळा शहरासाठी भूमिगत लाईन टाकण्यात येणार असल्याचे गेल्या दोन वर्षांपासून बोलले जात आहे. ती भूमिगत लाईन होईल तरी कधी, असा सवाल केला जात आहे.

५ ऑगस्ट रोजी श्री गणेश मंगल कार्यालय येथे झालेल्या सभेत कार्यकारी अभियंता प्रदीप डालू यांनी तळा शहरासह तालुक्याचा वीजपुरवठा सुरळीत होईल असे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. या पार्श्वभूमीवर नुकतीच भाजप पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त करत उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता यांच्याशी चर्चा केली होती. विजेचा चाललेला लपंडाव गणेशोत्सवापूर्वी थांबावावा, अशी मागणी आता होत आहे.

## नागोठण्यात एक गाव एक गोविंदा संकल्पना!

### आई जोगेश्वरी पथकाच्या टी-शर्टचे अनावरण



**नागोठणे : बातमीदार**

आपण पाहतो की आपल्याकडे वर्षाचे ३६४ दिवस एकमेकांचे पाय ओढण्यात सर्वत्र मग्न असतात. मात्र गोकुळाष्टमी हा असा एकमेव सण आहे की, आपण एकमेकांचा आधार घेत थरावर थर रचून दहीहंडी फोडत असतो. अनेक ठिकाणी गणेशोत्सव काळात एक गाव, एक गणपती संकल्पना पाहायला मिळते. नागोठण्यात एक गाव, एक गोविंदा ही संकल्पना अत्यंत कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार आमदार अनिकेत तटकरे यांनी काढले.

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पूर्वसंध्येला नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या मंदिरात गुरुवारी (दि.३) रात्री आई जोगेश्वरी गोविंदा पथकाच्या टी-शर्टचे अनावरण करण्यात आले. त्यावेळी आमदार बोलत होते.

या कार्यक्रमाला आई जोगेश्वरी गोविंद पथकाचे पुरस्कर्ते, राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन, नरेंद्र जैन, भाई टके, शिवराम शिंदे, राष्ट्रवादीचे विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शहराध्यक्ष बाळासाहेब टके, संजय भोसले, सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, सदस्य अकलाख पानसरे, ॲड. प्रकाश कांबळे, सचिन ठोंबरे, पूनम काळे, भाविका गिजे, अमृता महाडिक, हिराजी शिंदे, शैलेश रावकर, आई जोगेश्वरी गोविंदा पथकाचे अध्यक्ष भरत गिजे, प्रशिक्षक राजेश सुर्वे, रवी जासूद, किशोर जैन मित्र मंडळाचे अध्यक्ष ॲड. रमेश जाधव, कार्यवाह सुरेश गिजे, मनोज टके, जितेंद्र जाधव, धनंजय जगताप, खजिनदार घनश्याम ताडकर आदींसह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश सुर्वे यांनी केले.

## रेवदंडा अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

येथील रेवदंडा अर्बन बँकेची ९७वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच बँकेच्या सभागृहात झाली. सभेला बँकेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे विद्यमान अध्यक्ष नजमुसाकिब म. अ. लांबाते होते. त्यांनी प्रास्ताविकात बँकेच्या आर्थिक स्थितीचा तसेच वर्षभरातील कामकाजाचा आढावा सभासदांसमोर मांडला.

सभेला बँकेच्या उपाध्यक्ष धरती राऊत, संचालक वामन घरत, प्रभाकर नाईक, जाकिरअली हमदुले, सतिश लेले, आरती मढवी, गजानन झेंडेकर, अंजनकुमार तांबडकर, अरुण म्हात्रे, महेंद्र पाटील, मंगेश परभाळे, निलेश गाडे तसेच तज्ज्ञ संचालक शादाब महंमद रफिक काटे यांची प्रमुख उपस्थिती होती. बँकेचे मुख्याधिकारी दिनेश माळी यांच्यासह कर्मचारीवर्गही हजर होता. सभेत मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे, सन २०२५-२६मधील आर्थिक कामकाज व नफ्याच्या विनियोगास मान्यता देणे, वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे, सन २०२४-२५च्या वैधानिक लेखापरीक्षणातील दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे तसेच सन २०२६-२७च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.



वैधानिक लेखापरीक्षकांच्या पुनर्नियुक्तीबाबतचा प्रस्ताव, सहकार विभागामार्फत जाहीर करण्यात आलेल्या कर्जफेड योजनेंतर्गत झालेल्या कर्जखात्यांची नोंद, सभेला गैरहजर सभासदांची अनुपस्थिती माफ करण्याबाबतचा विषय तसेच संचालक मंडळाने सभेपुढे ठेवलेल्या विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

# टीम इंडियाची सेमीफायनलमध्ये धडक

## आशिया कपमध्ये स्मृती-दीप्तीचा विश्वविक्रमी धमाका



**दुबई : वृत्तसंस्था**

महिला टी-२० आशिया कप स्पर्धेतील दुबईच्या मैदानात हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाने १३७ धावांनी दणदणीत विजय नोंदवत सेमीफायनलमध्ये धडक मारली. स्मृती मानधनाच्या विक्रमी शतकी खेळीच्या जोरावर टीम इंडियाने हाँगकाँगसमोर १९४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना हाँगकाँगचा संघ अवघ्या ५६ धावांत आटोपला.

प्रथम फलंदाजी करताना स्मृती मानधनाने महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विश्वविक्रम आपल्या नावे केला. दुसरीकडे गोलंदाजी करताना दीप्ती शर्माने तीन विकेट्स घेत महिला टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम आपल्या नावे केला.

पहिल्यांदा फलंदाजी करताना स्मृती मानधना आणि शफाली वर्माने टीम इंडियाला दमदार सुरुवात करून दिली. दोघींनी पहिल्या विकेटसाठी ७४ धावांची भागीदारी रचली. शफाली २८ धावांवर बाद झाल्यानंतर स्मृतीने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. तिने ६४ चेंडूंत १४ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने १२४ धावांची दमदार खेळी केली. सलग दुसऱ्या सामन्यात धावबाद होण्यापूर्वी स्मृतीने एकाच डावात दोन विश्वविक्रमांना गवसणी घातली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा मिताली राजचा विक्रम तिने मोडीत काढला. याशिवाय, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रमही तिने आपल्या नावे केला.

स्मृतीशिवाय प्रतीका रावल १० (१२), रिचा घोष ११ (१३) आणि कर्णधार हरमनप्रीत कौर १० (९) यांनी दुहेरी आकडा गाठल्यानंतर माघार घेतली. भारती फुलमालीने नाबाद दोन, तर दीप्ती शर्माने एक धाव करत भारताच्या धावफलकावर निर्धारित २० षटकांत पाच विकेट्सच्या मोबदल्यात १९३ धावा लावल्या. हाँगकाँगकडून मारिनाने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय रुचिता आणि ज्योलीनी कौरने प्रत्येकी एक विकेट घेतली.

भारतीय संघाने दिलेल्या धावसंख्येचा पाठलाग करताना हाँगकाँगच्या संघातील फक्त तिघींनी दुहेरी आकडा गाठला. कर्णधार नताशा माइल्स २७ चेंडूत १५ धावांची खेळी करताना कॅलेंडर ईयरमध्ये सर्वाधिक धाव करणाऱ्या बटर्सच्या यादीत अव्वलस्थानी झेप घेतली. विकेट किपर बॅटर यास्मिन दासवानी हिने २३ चेंडूत ११ तर मरिना लॅम्प्लो हिने १५ चेंडूत १४ धावा केल्या. टीम इंडियाकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. या कामगिरीच्या जोरावर तिने आंतराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक १७४ विकेट्स खात्यात जमा करत विश्वविक्रमाला गवसणी घातली. तिच्याशिवाय नंदिनी शर्मा, श्री चरणी आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या.

# स्मृती मानधनाने मोडला मिताली राजचा विक्रम



निवृत्तीनंतर स्मृतीने भारतीय महिला क्रिकेटमधील सर्वात मोठी फलंदाजीची स्टार म्हणून नवनवीन उंची गाठत आहे.

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मानधनाने आणखी एक विक्रम रचला आहे. तिने भारताची माजी कर्णधार मिताली राजला मागे टाकत महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारी क्रिकेटपटू बनण्याचा मान मिळवला आहे.

स्मृती मानधना तिचे ३६वे टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले. षटकार मारून तिने आपले शतक पूर्ण केले, मात्र यासाठी तिला ४० चेंडू लागले. त्यानंतर वेग वाढवत तिने केवळ १७ चेंडूंमध्ये आपले पुढचे अर्धशतक पूर्ण केले. स्मृतीने ५७ चेंडूंमध्ये आपले दुसरे टी-२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले. स्मृतीने ६४ चेंडूंमध्ये १४ चौकार आणि सात षटकारांसह १२४ धावा केल्या.

**सर्वाधिक धावा करणारी महिला क्रिकेटपटू**

महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०,८८० मानधनाने धावा केल्या असून तिने मिताली राजचा १०,८६८ धावांचा विक्रम मागे टाकला आहे. मितालीने दीर्घकाळ या यादीत अव्वल स्थान पटकावले होते आणि ती भारतीय महिला क्रिकेटमधील सर्वात यशस्वी फलंदाजांपैकी एक राहिली आहे. तिच्या

### शतकांमध्येही अव्वल

स्मृती मानधनाने महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकांचा नवीन विक्रमही प्रस्थापित केला आहे. तिच्या नावावर आता १८ आंतरराष्ट्रीय शतके आहेत. या यादीत तिने ऑस्ट्रेलियाची मेग लॅनिंग आणि दक्षिण आफ्रिकेची लॉरा वॉल्व्हार्ड यांना मागे टाकले आहे. लॅनिंग आणि वॉल्व्हार्ड प्रत्येकी १७ शतकांसह दुसऱ्या स्थानावर बरोबरीत आहेत.

# सीपीएलमध्ये शनाकाचे विक्रमी शतक



**वॉर्नर पार्क : वृत्तसंस्था**

श्रीलंकेचा अनुभवी अष्टपैलू दासुन शनाका याने कॅरेबियन प्रीमियर लीग लीगमध्ये फक्त ३९ चेंडूत शतक साजरे करत नवा इतिहास रचला आहे. वॉर्नर पार्कच्या मैदानात सेंट किट्स अँड नेविस पॅट्रियट्स संघाकडून खेळताना शनाकाने सेंट लूसिया किंग्सविरुद्धच्या सामन्यात आठ चौकार आणि १२ षटकारांची बरसात करत विक्रमी शतक झळकावले.

या खेळीसह शनाका कॅरेबियन प्रीमियर लीगच्या इतिहास सर्वात जलद शतकी खेळी करणारा खेळाडू ठरला. त्याच्या शतकी खेळीच वैशिष्ट्ये म्हणजे ९.२ षटकांत ८९ धावांवर दुसरी विकेट पडल्यावर तो मैदानात उतरला अन् ६४ चेंडूचा खेळ बाकी असताना त्याने तुफानी फटकेबाजीसह शतक साजरे केले. त्याने ४२ चेंडूत नाबाद १२१ धावांची खेळी केली. त्याच्या या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर सेंट किट्स अँड नेविस पॅट्रियट्स संघाने निर्धारित २० षटकांत चार विकेट्सच्या मोबदल्यात २३५ धावा केल्या. धावांचा पाठलाग करताना सेंट लूसिया किंग्सटा संघ १३.५ षटकांत फक्त ९८ धावांवर आटोपला. पॅट्रियट्सच्या संघाने १३७ धावांनी सर्वात मोठा विजय नोंदवला.

# युझवेंद्रच्या अफलातून चेंडूवर स्टोक्सची दांडी गुल

**लंडन : वृत्तसंस्था**



फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहल गेल्या काही वर्षांपासून भारतीय संघातून बाहेर आहे. आयपीएलमध्ये चमकल्यानंतर आता तो इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या काऊंटी चॅम्पियनशिपमध्ये दमदार कामगिरी करत आहे. यादरम्यान त्याने इंग्लंडचा माजी कर्णधार बेन स्टोक्सला बाद केल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

युझवेंद्र चहल या स्पर्धेत नॉर्थम्पटनशायर संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. या स्पर्धेत डरहॅमविरुद्धच्या सामन्यात ४७वे षटक टाकण्यासाठी चहल गोलंदाजीला आला. त्यावेळी स्टोक्स १४ धावांवर फलंदाजी करत होता. चहलने षटकातील तिसरा चेंडू ऑफ स्टंपच्या खूप बाहेर टाकला. स्टोक्सने उजवा पाय पुढे काढून चेंडू डिफेन्स करण्याचा प्रयत्न केला, पण काही कळायच्या आत चेंडू ऑफ स्टंपला जाऊन धडकला. हे पाहून बेन स्टोक्सही आश्चर्यचकीत झाला.

# वैभव सूर्यवंशी फायनल खेळणार का?



**चेन्नई : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमधील प्रतिष्ठेच्या दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात पूर्व विभाग आणि दक्षिण विभाग आमनेसामने येणार आहेत. चेन्नईतील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर हा जेतेपदाचा सामना रंगणार आहे. या सामन्यात 'वंडर बॉय' वैभव सूर्यवंशीवर पुन्हा एकदा सर्वांच्या नजरा असणार आहेत, मात्र वैभव फायनलमध्ये खेळणार की नाही याबाबतचा निर्णय भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मंजुरीवर अवलंबून असेल.

दक्षिण विभाग आणि पूर्व विभाग यांच्यात ६ सप्टेंबरपासून चेन्नईमध्ये दुलीप ट्रॉफी स्पर्धेतील अंतिम सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात केएल राहुल, देवदत्त पडिक्कल आणि मोहम्मद सिराज यांना फायनलमध्ये खेळण्याची विनंती करण्यात आली आहे. दुसरीकडे वैभव सूर्यवंशीसह फायनलमधील दोन्ही संघाचे कर्णधार ईशान किशन आणि तिलक वर्मा यांच्यात खेळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

पीटीआयने बीसीसीआयच्या सूत्राच्या हवाले दिलेल्या वृत्तानुसार लोकेश राहुल, देवदत्त पडिक्कल आणि मोहम्मद सिराज यांना सध्या कोणताही स्पर्धात्मक सामना खेळायचा नाही. राष्ट्रीय निवडकर्त्यांना उपलब्ध असलेल्या प्रत्येक भारतीय खेळाडूने दुलीप ट्रॉफीच्या फायनलमध्ये सहभागी व्हावे, अशी इच्छा आहे. या तिघांनी २७ ऑगस्टला अखेरचा सामना खेळला होता. आता ते २७ सप्टेंबरपासून वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळताना दिसतील.

### ईशान, तिलकच्या खेळण्यावरही प्रश्नचिन्ह

दक्षिण विभागाचा कर्णधार तिलक वर्मा, पूर्व विभागाचा कर्णधार ईशान किशन आणि वैभव सूर्यवंशी हे तिघेही भारतीय टी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा भाग आहेत. त्यामुळे या तिघांच्या दुलीप ट्रॉफी फायनलमधील सहभागाचा निर्णय मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मंजुरीवर अवलंबून आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ ९ किंवा १० सप्टेंबरला दिल्लीत एकत्र येईल. जर मुख्य प्रशिक्षकांनी तिघा खेळाडूंना ठरलेल्या वेळेत हजर राहण्यास सांगितले, तर त्यांना दुलीप ट्रॉफी स्पर्धेत खेळता येणार नाही. फायनल खेळल्यानंतर भारतीय संघात सहभागी होण्याचा एक पर्यायही आहे.

# रोहित शर्मापाठोपाठ आगरकरांनाही दिलासा?

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटमधील सध्याच्या घडामोडींमध्ये रोहित शर्मा आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांच्या भवितव्याबाबत सुरू असलेल्या चर्चांना बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी काही प्रमाणात पूर्णविराम दिला आहे.

मुंबईत बीसीसीआयची महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत भारतीय संघाची अलीकडील कामगिरी, खेळाडूंच्या दुखापती, आगामी मालिका आणि २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकाची तयारी यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, कसोटी आणि वनडे कर्णधार शुबमन गिल, टी-२० कर्णधार श्रेयस अय्यर, व्हीव्हीएस लक्ष्मण आणि बीसीसीआय सचिव देवजित सैकिया उपस्थित होते, मात्र मुख्य निवडकर्ता अजित आगरकर बैठकीला उपस्थित नव्हते. बैठक अल्प सूचनेवर बोलावण्यात आली होती आणि आगरकर शहराबाहेर असल्याने ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. ज्या ठिकाणी ते होते, तिथे इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नसल्याने ते ऑनलाइनही सहभागी होऊ शकले नाहीत, अशी माहिती सैकिया यांनी दिली.

अजित आगरकर बैठकीला नसल्याने त्यांच्या मुख्य निवडकर्ता पदाच्या भवितव्याबाबत चर्चांना उधाण आले होते, मात्र सैकिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, या बैठकीत निवड समिती किंवा आगरकर यांच्या कार्यकाळाबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. त्यामुळे आगरकर यांची हकालपट्टी किंवा त्यांचा कार्यकाळ संपवण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही.

दरम्यान, रोहित शर्माच्या भवितव्याबाबत सैकिया यांची प्रतिक्रिया चर्चेत आली. रोहित सध्या चांगला खेळत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे २०२७ एकदिवसीय विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर रोहितसाठी हा सकारात्मक संकेत मानला जात आहे, मात्र बीसीसीआयने रोहितचे विश्वचषकामधील स्थान अद्याप अधिकृतपणे निश्चित केलेले नाही.

बैठकीत पुढील 'सेना' दौऱ्यांसाठी खेळाडूंना पुरेसा आराम, अनुकूलन आणि गरजेनुसार सराव सामने देण्याच्या रणनीतीवरही चर्चा झाली तसेच पुढील वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी सर्वोत्तम टीम कॉम्बिनेशन तयार करण्यावर बीसीसीआयचा भर राहणार आहे.

# बुमराहसाठी प्रिन्स यादव बॅकअप्!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ येत्या काही दिवसात भारतीय संघ कसोटी आणि वनडे सामन्याची मालिका खेळण्यासाठी न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेआधी जसप्रित बुमराहने सराव व्हावा म्हणून भारतीय अ संघासाठी खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

दरम्यान, बुमराहची रिप्लेसमेंट म्हणून प्रिन्स यादवला खेळण्याची संधी मिळू शकते. बुमराह बऱ्याचदा दुखापतीमुळे संघाबाहेर असतो. तो सध्या बंगळुरूतील सेंटर ऑफ एक्सिलेंसमध्ये आपली फिटनेस पुन्हा मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. या पार्श्वभूमीवर बीसीसीआय बुमराहच्या जागी गोलंदाजी करणाऱ्या वेगवान गोलंदाजाच्या शोधात आहे. त्या दृष्टीने प्रिन्स यादव हे नाव आघाडीवर आहे.

# रोहित यादवसह ६२ क्रिकेटर्सवर दोन वर्षांची बंदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी मालिकेसाठी भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड झालेला बंगालचा लेगस्पिनर रोहित यादववर बीसीसीआयने दोन वर्षांची बंदी घातली आहे. त्याच्याबरोबर इतर ६२ खेळाडूंवरही कारवाई करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेशचा मूळ रहिवासी असलेल्या रोहितने जुलैमध्ये भारतीय १९ वर्षांखालील संघासोबत श्रीलंका दौरा केला होता. या दौऱ्यात त्याने सहा विकेट्स घेतल्या आणि संघाला अखेरचा कसोटी सामना जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. रोहितची ऑस्ट्रेलिया १९ वर्षांखालील संघाविरुद्ध राजकोट आणि अहमदाबाद येथे या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या भारताच्या अंडर-१९ घरच्या वनडे आणि मल्टी-डे सामन्यांसाठीही निवड झाली होती.

श्रीलंका दौऱ्यादरम्यान रोहितच्या कागदपत्रांची पडताळणी करताना वयाबाबत विसंगती समोर आली. रोहितकडे जन्मवर्ष वेगवेगळे दाखवणारी तीन जन्म प्रमाणपत्रे असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वयोगटाच्या क्रिकेटमध्ये खेळण्यासाठी तो अपात्र ठरला. रोहित यादवच्या आधार कार्डच्या नोंदींमध्येही वयाबाबत विसंगती आढळून आली. या विसंगतींमुळे बंगाल क्रिकेट असोसिएशनने (सीएबी) यापूर्वीच रोहितला आपल्या कनिष्ठ संघांमधून दूर ठेवले होते आणि याबाबत बीसीसीआयलाही माहिती दिली होती.

आता बीसीसीआयने रोहितवर दोन वर्षांसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळण्याची बंदी घातली आहे. रोहित हा अशा ६२ खेळाडूंमध्ये आहे, ज्यांना कागदपत्रे आणि वयासंबंधीच्या विसंगतींमुळे सीएबीने २०२६-२७ आणि २०२७-२८ हंगामात कोणत्याही स्पर्धेसाठी नोंदणी किंवा ट्रान्सफर करण्यास अपात्र ठरवले आहे. या निर्णयाची माहिती सर्व संलग्न राज्य क्रिकेट संघटनांना देण्यात आली आहे.

# आशियाई खेळांसाठी दुखापतग्रस्त नीरजच्या जागी यशवीर सिंगला संधी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता भालाफेकपटू यशवीर सिंगचा दुखापतग्रस्त नीरज चोप्राच्या जागी जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठीच्या भारतीय ॲथलेटिक्स संघात समावेश करण्यात आला आहे.

भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने लुधियाना येथे एका पत्रकार परिषदेत १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या ऐची-नागोया आशियाई खेळांसाठी ७७ सदस्यीय भारतीय ॲथलेटिक्स संघाची घोषणा केली. राष्ट्रीय युवा चॅम्पियनशिप स्पर्धादेखील लुधियाना येथे आयोजित करण्यात येत आहेत.

एएफआयचे अध्यक्ष बहादूर सिंग सग्गू म्हणाले की, सध्या दुखापतग्रस्त असलेल्या नीरज चोप्राच्या जागी आम्ही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेता यशवीरचा समावेश केला आहे.

पुरुष ११० मीटर अडथळा शर्यतीचा धावपटू तेजस शिरसे यालाही ग्लासगो येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल खेळांदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे संघातून वगळण्यात आले आहे, तर धावपटू अभिषेक पाल याला कथित उत्तेजक द्रव्य सेवनाच्या उल्लंघनाबद्दल 'नाडा'कडून नोटीस बजावण्यात आल्यानंतर संघातून वगळण्यात आले आहे.

यशवीर सिंगने नुकत्याच झालेल्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ८५.४१ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करत कांस्यपदक जिंकले होते. त्याच्या या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे तो नीरजसाठी सर्वोत्तम पर्याय ठरला. जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई खेळांमध्ये पुरुषांच्या भालाफेक प्रकारात यशवीर आणि रोहित यादव हे दोन खेळाडू भारताचे आव्हान सादर करतील.

# बर्थडे बॉय अभिषेक शर्माला गुरू युवराजकडून हटके शुभेच्छा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय टी-२० क्रिकेट संघाचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा याने शनिवारी (दि.४) आपला २६वा वाढदिवस साजरा केला. त्याचा मेंटॉर आणि भारताचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगने आपल्या चेल्याला मजेशीर अंदाजात शुभेच्छा दिल्या.

युवराजने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये तो अभिषेक शर्माला कान पकडून उठाबशा काढायला लावताना दिसत आहे. यावेळी युवराजने अभिषेककडून चार मोठी वचनेही घेतल्याचे दिसून येते.

पहिल्याच चेंडूपासून मोठे फटके मारण्यासाठी प्रसिद्ध असलेला स्फोटक फलंदाज अभिषेक शर्मा या व्हिडीओमध्ये त्याचा गुरू युवराज सिंगच्या सांगण्यावरून उठाबशा काढताना दिसत आहे. एवढेच नाही तर युवी त्याच्याकडून पहिल्या बॉलवर लप्पा मारणार नाही, वेळ घेऊन बॅटिंग करेन, विचार करून धावा करण्यावर लक्ष केंद्रित करेन आणि पहिल्या बॉलवर मोठा फटका मारणार नाही, अशी चार वचने वदवून घेताना दिसत आहे.

पंजाबमधील अमृतसर येथून भारतीय संघापर्यंत पोहचलेल्या अभिषेक शर्माच्या कारकिर्दीत युवराज सिंगचा मोठा वाटा आहे. स्वतः डावखुरा आक्रमक फलंदाज राहिलेल्या युवराजने अभिषेकच्या आक्रमक विचारसरणीला योग्य दिशा देण्याचे काम केले. २०१८ अंडर-१९ वर्ल्डकप विजेत्या संघाचा भाग राहिलेल्या अभिषेकने काव्या मारनच्या मालकिच्या सनरायझर्स हैदराबादकडून सलामीवीराच्या रुपात खास छाप सोडली. आता तो टी-२०मधील टीम इंडियाचा पहिल्या पसंतीचा सलामीवीर आहे. बर्थडेच्या दिवशी युवीने किस्सा शेअर करत टीम इंडियाच्या या स्टार फलंदाजाला खास अंदाजात शुभेच्छा दिल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com